दैनिक www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२९८ | मंगळवार दि.२४ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वैचारिक आतंकवादाचा विळखा आणि जबाबदारी

महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची आणि क्रांतिकारी विचारांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर यांनी विश्वमानवतेचा संदेश दिला, संत तुकाराम यांनी भक्तीमधून समतेचा ध्वज उंचावला, महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाची चळवळ उभारली, छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षणासारख्या क्रांतिकारी निर्णयांद्वारे वंचितांना संधी दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेवर आधारलेले राज्यघटनात्मक मूल्य देशाला दिले.

# मान्सूनवर एल निनोचे सावट!

## २०२६ चा उत्तरार्ध धोकादाय अन् बळीराजाची चिंता वाढविणारा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**२०२६ च्या शेवटच्या सहा महिन्यांत एल निनो येण्याची शक्यता आहे. ऑगस्ट ते नोव्हेंबर या काळात एल निनो येण्याची शक्यता ६० टक्के असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यापूर्वी हा अंदाज ५०% होता, मात्र आता त्यात वाढ झाली आहे. साधारणपणे एल निनो सक्रिय असणाऱ्या वर्षात भारतात पाऊस कमी पडतो आणि उन्हाळ्याचा तडाखा जास्त जाणवतो. हवामानाचा नवीन अंदाज देशातील बळीराजाची चिंता वाढविणारा आहे.**



कोलंबिया विद्यापीठ आणि नासा यांच्या अहवालानुसार, पॅसिफिक महासागरातील ला निनाचा प्रभाव आता संपत चालला आहे. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत ही परिस्थिती निवळली आहे. फेब्रुवारी ते एप्रिल २०२६ मध्ये ला निना राहण्याची शक्यता फक्त ४ टक्के आहे. म्हणजेच, या काळात हवामान सामान्य स्थितीत राहण्याची शक्यता ९६ टक्के इतकी आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ही शक्यता ६५ टक्के इतकी होईल, असे कोलंबिया क्लायमेट स्कूलच्या इंटरनॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूटने १९ फेब्रुवारी रोजी स्पष्ट केले आहे. हवामान विभागाच्या मते, फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान ला निना संपून हवामान सामान्य ▶▶ पान २ वर

### जागतिक हवामान संघटनेचा नवा अंदाज

जागतिक हवामान संघटनेचा २० फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, मार्च ते मे २०२६ या काळात पॅसिफिक महासागराच्या तापमानात मोठे बदल होणार आहेत. सध्या समुद्राच्या पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा कमी आहे, ज्याला आपण ला निना म्हणतो; पण आता हे तापमान हळूहळू वाढू लागेल. याचाच अर्थ असा की, सध्याचा कमकुवत झालेला ला निना आता पूर्णपणे संपून हवामान सामान्य स्थितीकडे सरकणार आहे.

## थोडक्यात...

### राज्यपालांच्या अभिभाषणाने अधिवेशनाची सुरुवात

मुंबई : महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात मुंबईत राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दोन्ही सभागृहांना संबोधित करताना सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना मांडल्या आणि विकसित महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार व्यक्त केला. आपल्या भाषणात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप स्पष्ट केला. महाराष्ट्र परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषत: विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीसाठी मोठी पावले उचलण्यात येत असून विदर्भात स्टील कॉरिडॉर उभारण्याची घोषणा त्यांनी केली.

### नायजेरियात सशस्त्र हल्ल्यात ३८ जणांची हत्या

अबुजा: नायजेरियाच्या वायव्येकडील झामफारा प्रांतात सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात ३८ जणांची हत्या करण्यात आली आणि अन्य काही जणांचे अपहरण करण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले. या हल्ल्याबाबतची पूर्वकल्पना गुप्तचरांकडून पोलिसांना मिळाली होती. मात्र रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे या ठिकाणी पोलिस वेळेपुर्वी पोचू शकले नाहीत आणि हा हल्ला रोखू शकले नाहीत, पोलीस या ठिकाणी पोचेपर्यंत हल्लेखोरांनी हल्ला करून ३८ जणांची हत्या केली होती, असे प्रांताच्या पोलिसांचे प्रवक्ते याझिद अबूबकर यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. अपहरण झालेल्यांमध्ये महिला आणि मुलांचा समावेश आहे. झामफारा प्रांतातील अंका या स्थानिक प्रशासकीय भागात टंगन डस्ट समुदायावर हा हल्ला करण्यात आला होता. या भागात वांशिक द्वेषातून असे हल्ले अधून मधून केले जात असतात.

### प्रदेश भाजप कार्यकारिणीची मंगळवारी घोषणा

मुंबई: भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील प्रदेश भाजपची कार्यकारिणी मंगळवारी जाहीर होणार आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने नव्या प्रदेश कार्यकारिणीला मंजुरी दिली आहे. २०२९ सालच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, नव्या कार्यकारिणीत नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. गेल्यावर्षी जुलै महिन्यात रविंद्र चव्हाण यांची भाजप प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मात्र ८ महिने उलटले तरी नवीन प्रदेश कार्यकारिणी जाहीर झालेली नव्हती. त्यात लागोपाठ नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका लागल्याने कार्यकारिणीची घोषणा लांबणीवर पडली. सत्तेत असूनही संघटनात्मक नियुक्त्या रखडल्याने भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. प्रदेश भाजपने केंद्रीय नेतृत्वाकडे मंजुरीसाठी पाठवलेली यादी दोनवेळा परत आली. केंद्रीय नेतृत्वाने त्यातील काही नावांमध्ये सुधारणा सुचवल्या. त्यानुसार आता प्रदेश कार्यकारिणीची अंतिम यादी निश्चित करण्यात आली असून, उद्या मंगळवारी त्याबाबतची अधिकृत घोषणा अपेक्षित आहे.

# जि.प., पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडणार

## ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडून निवडणुका घेणे चुकीचे–सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे डोळे लावून बसलेल्या राजकीय वर्तुळासाठी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडून जिल्हा परिषद निवडणुका घेणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि संबंधित पंचायत समित्यांच्या निवडणुका आता पुन्हा एकदा लांबणीवर पडल्याचे स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्र राज्यातील प्रलंबित निवडणुकांसंदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणी पार पडली. राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायती, महानगरपालिका तसेच १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या सद्यस्थितीची माहिती न्यायालयाने घेतली. राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयात सादर केलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. मात्र, उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका आरक्षणाच्या तांत्रिक मुद्द्यामुळे अद्याप प्रलंबित आहेत. सुनावणी दरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून निवडणुका घेण्याची प्रक्रिया अयोग्य आहे. ज्या ठिकाणी ही मर्यादा ओलांडली जात आहे, तिथे निवडणुका ▶▶ पान २ वर

# अजितदादा महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात झाले भावूक



मुंबई । प्रतिनिधी

विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. दादा आपल्यात नाहीत, ही खंत मनाला चटका लावणारी आहे, असे सांगताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले.

अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले. दादांच्या काम करण्याच्या पद्धतीबाबत बोलताना फडणवीस यांनी अनेक आठवणी सांगितल्या. मंत्रालयात कुठल्याही अधिकाऱ्यांपेक्षा आधी पोहोचणारे ते नेते होते. सकाळी नऊ वाजता ते आपल्या दालनात बसलेले असायचे. वेळेचे काटेकोर पालन आणि कामातील शिस्त हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. एखादा निर्णय त्यांना योग्य वाटला नाही तर ते फाईल थांबवून सविस्तर चर्चा करत. निर्णय घाईत न घेता विचारपूर्वक घेण्याची त्यांची सवय होती, असे त्यांनी स्पष्ट केले. दादांच्या काही वैयक्तिक सवयींचाही फडणवीस यांनी उल्लेख केला. त्यांना दूध पिण्याची आवड होती. दादांच्या साध्या सवयी आणि स्वच्छतेकडे ▶▶ पान २ वर

## दिल्लीला खलिस्तान करण्यासोबतच महाराष्ट्र सदन बॉम्बने उडविण्याची धमकी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्लीला खलिस्तान करण्याची सोमवारी (दि. २३) पुन्हा एकदा धमकी मिळाली. दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन, दिल्ली विधानसभा, शाळा आणि विविध संस्थांना बॉम्बच्या धमकीचे ईमेल आले. यामुळे राजधानीतील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली. नवीन महाराष्ट्र सदनसह राजधानीतील धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांजवळ अतिरिक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती करण्यात आली. विविध ठिकाणी बॉम्बचा तपास घेतला असता धमकी खोटे असल्याचे निष्पन्न झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ईमेलद्वारे बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्यानंतर दिल्लीतील सर्व मेट्रो स्थानकांवर आणि प्रमुख ठिकाणी सुरक्षा कडक करण्यात आली. खलिस्तान नॅशनल आर्मीने पाठवलेल्या ईमेलमध्ये ''दिल्ली बनेगा खलिस्तान'' असे लिहिले होते आणि पुढील तीन दिवसांत दिल्ली आर्मी स्कूल, लाल किल्ला आणि मेट्रो स्थानकांवर स्फोट होण्याची धमकी देण्यात आली होती.

## शेतकऱ्यांच्या संसारावर वरवंटा फिरवणारा शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही–राजू शेट्टी

सांगली । प्रतिनिधी



प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या माध्यमातून ५० हजार कोटींचा ढपला पाडण्यासाठी मुख्यमंत्र्यांची धडपड सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. हा महामार्ग हा राज्यातील जनतेच्या हितासाठी नाही. देवदेवतांच्या नावाखाली अदानींचा विकास करण्याचा यामागे उद्देश आहे. त्यासाठी १२ जिल्ह्यांतील हजारो एकर सुपीक जमिनीवर पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संसारावर वरवंटा फिरवला जाणार आहे. यामुळे शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही, असा इशारा शेट्टी यांनी दिला आहे.

ते सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी (दि.२३) काढलेल्या शक्तिपीठविरोधी मोर्चादरम्यान बोलत होते. गेल्या दोन दिवसांपासून राज्य सरकार सुधारीत शक्तिपीठ महामार्गासाठी संयुक्त मोजणी करत आहे. पोलिसांच्या मदतीने शेतकरी, महिला यांना रात्री, अपरात्री अटक करून दडपशाहीने ही मोजणी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परभणीसह राज्यातील विविध भागातील शेतकरी गेली दोन दिवस या महामार्गाला कडाडून विरोध करत आहेत. सुरवातीला देवांच्या नावाखाली हा मार्ग आखला होता, पण आता शेतकऱ्यांच्या विरोधानंतर सोयीनुसार हा मार्ग बदलला जावू लागला ▶▶ पान २ वर

## मविआच्या बैठकीला शरद पवार गटाची दांडी

मुंबई । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस विलीनीकरणाच्या चर्चा सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने विरोधी पक्षाच्या बैठकीला न येणे महाविकास आघाडी संभ्रम वाढवणारे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मविआच्या बैठकीला येण्याची टाळाटाळ केली आहे का? अशी चर्चा सुरू आहे. मात्र, आमचा पक्ष महाविकास आघाडीसोबतच अधिवेशनात सोबत असणार अशी भूमिका पक्षातील नेत्यांनी मांडली आहे. आपण का येऊ शकलो नाही याची कारणं महाविकास आघाडीतील इतर पक्षाच्या नेत्यांना कळवली असल्याचे म्हटलं आहे.

विधिमंडळ सुरू होण्यापूर्वी आदल्या दिवशी विरोधकांची एकत्रित पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला प्रामुख्याने जयंत ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७७.०० क्विंटल | २,१०० | २,७९० | २,३२२ |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.०० क्विंटल | २,००१ | ४,८४२ | ३,३७५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८६.०० क्विंटल | ६,५०० | ७,८११ | ७,५६२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,५०० | २,९५० | २,७२५ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| सोयाबीन: ११.५० क्विंटल | ४,८०० | ५,१७१ | ५,०४० |
| हरभरा: २३.५० क्विंटल | ४,९०० | ५,१२७ | ५,०१३ |

# भारतातील ९०% कफ सिरपमध्ये त्रुटी

## लहान मुलांच्या मृत्यूमध्ये वाढ, धक्कादायक माहिती समोर

दिल्ली । वृत्तसंस्था

**भारताच्या औषध नियामकाने देशातील जवळपास ९०% कफ सिरप उत्पादकांची तपासणी केली आहे आणि त्यात अनुपालनातील त्रुटी आढळल्या आहेत, असे त्यांच्या प्रमुखांनी सोमवारी (२३ जानेवारी २०२६) सांगितले. भारतात बनवलेल्या सिरपचा देशात आणि परदेशात मुलांच्या मृत्यूशी संबंध असल्याचे आढळल्यानंतर वाढत्या तपासणी दरम्यान ही माहिती समोर आली आहे.**

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये २४ मुलांच्या मृत्यूशी जोडलेल्या डायथिलीन ग्लायकोलने दूषित कफ सिरपच्या ब्रँडचा शोध लागल्यानंतर ही तपासणी करण्यात आली. कोल्ड्रिफ नावाचे हे उत्पादन तामिळनाडूमधील स्थित स्रेसन फार्मास्युटिकलने बनवले होते. गंभीर गैर–अनुपालनांवर आम्ही गंभीर कारवाई केली आहे आणि आमचा विश्वास आहे की कफ सिरप उत्पादनातील कुजबुज दूर केली जाईल, असे ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया राजीव रघुवंशी यांनी मुंबईतील आयपीए ११ व्या ग्लोबल फार्मास्युटिकल क्वालिटी समिटमध्ये सांगितले. नियामक कफ सिरप उत्पादनांभोवतीच्या समस्या सोडवण्याचा विचार करत आहे, असे त्यांनी सांगितले, परंतु त्यांनी वेळ निश्चित केली नाही. २०२२ पासून आफ्रिका आणि मध्य आशियामध्ये १४० हून अधिक मुलांच्या मृत्यूंशी भारतात बनवलेल्या कफ सिरपचे संबंध



जोडल्यानंतर, ज्यामुळे ''जगातील फार्मसी'' म्हणून त्यांची प्रतिष्ठा कमी झाली आहे, ४२ अब्ज डॉलर्सच्या फार्मा उद्योगावर देखरेख वाढवण्याचा दबाव एजन्सीवर आहे. सर्व कफ सिरप उत्पादकांपैकी सुमारे ९०%, सुमारे १,१००, ची तपासणी करण्यात आली आहे, असे रघुवंशी म्हणाले आणि चांगल्या उत्पादन पद्धतींचे उल्लंघन, येणाऱ्या कच्च्या मालाची चाचणी करण्यात अपयश आणि अवैध पद्धती किंवा प्रक्रियांचा वापर याकडे लक्ष वेधले. त्यांनी अनुपालन न करणाऱ्या कंपन्यांचे नाव घेतले नाही. नियामकाने जोखीम मूल्यांकन करण्यासाठी अतिरिक्त १,२५० औषध उत्पादन युनिट्सची देखील सुरक्षात्मक तपासणी केली आहे, असे त्यांनी सांगितले, परंतु किती युनिट्सना अनुपालन समस्या ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# वैचारिक आतंकवादाचा विळखा आणि जबाबदारी

महाराष्ट्र ही संतांची, समाजसुधारकांची आणि क्रांतिकारी विचारांची भूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर यांनी विश्वमानवतेचा संदेश दिला, संत तुकाराम यांनी भक्तीमधून समतेचा ध्वज उंचावला, महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाची चळवळ उभारली, छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षणासारख्या क्रांतिकारी निर्णयांद्वारे वंचितांना संधी दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेवर आधारलेले राज्यघटनात्मक मूल्य देशाला दिले. या सर्वांचा वारसा म्हणजे व्यापक मानवतावाद, विवेक आणि बंधुता. परंतु आज चित्र उलटे दिसत आहे. ज्या भूमीतून समतेचा विचार रुजला, तिथेच जातीवादाचा उन्माद पसरताना दिसतो. महापुरुषांच्या विचारांचे सार्वत्रिकत्व बाजूला सारून त्यांना जातीच्या चौकटीत कैद करण्याचा उद्योग सुरू आहे. एखादा महापुरुष म्हणजे विशिष्ट समाजाची 'मालमत्ता' आहे, अशी भावना जाणीवपूर्वक पसरवली जाते. हा केवळ सामाजिक विकार नाही, तर एक प्रकारचा 'वैचारिक आतंकवाद' आहे, जो मनांवर आघात करतो, विवेकाला कुंठित करतो आणि समाजाला तुकडे-तुकडे करतो.

आजचे अनेक राजकारणी महापुरुषांचा वापर विचारांसाठी नव्हे, तर मतांसाठी करतात. जयंती-उत्सव, स्मारके, घोषणाबाजी यामध्ये विचारांपेक्षा दिखावा अधिक असतो. महापुरुषांचे नाव हे निवडणुकीचे 'इंधन' बनले आहे. त्यांच्या शिकवणुकीशी प्रत्यक्ष आचरणात काहीही देणेघेणे नसताना, सार्वजनिक व्यासपीठावर त्यांच्याच नावाने समाजाला भडकवले जाते. ही प्रवृत्ती अधिक धोकादायक आहे, कारण ती आदराच्या आवरणात द्वेष पसरवते.

यूट्यूब चॅनेल्स, सोशल मीडिया पेजेस आणि फेक न्यूजचा पूर ही आजची नवी शस्त्रे आहेत. 'व्ह्युज' आणि 'लाईक्स'च्या हव्यासापोटी इतिहासाची मोडतोड केली जाते. अर्धसत्य, खोट्या कथा आणि भडक मथळे यांच्या आधारे तरुणांच्या मनात संशय आणि द्वेषाची बीजे पेरली जातात. ज्या महापुरुषांनी समाजाला एकत्र आणले, त्यांच्याच नावाने समाज विभागण्याचे षड्यंत्र रचले जाते. डिजिटल प्लॅटफॉर्मवरील हा कचरा केवळ माहितीचा प्रश्न नाही; तो पुढील पिढीच्या मानसिक आरोग्यावर आणि सामाजिक जाणीवेवर घाला घालतो.

''जसे पेरणार तसे उगवणार'' हा निसर्गाचा नियम समाजालाही लागू होतो. जर आपण आज द्वेषाची पेरणी केली, तर उद्या हिंसा आणि अविश्वासाचे पीक उगवणारच. मग त्याचे परिणाम पिढ्यान्? पिढ्या भोगावे लागतील.

विचारवंतांचे मौन आणि समाजाची जबाबदारी

समाजातील सुजाण, प्रगल्भ आणि विचारवंत घटक जर या प्रवृत्तींविरुद्ध बोलत नसतील, तर तेही अप्रत्यक्षपणे दोषी ठरतात. अन्यायाविरुद्ध मौन धरणे म्हणजे अन्यायाला संमती देणे होय. जातीच्या नावावर रस्ते अडवणे, सोशल मीडियावर दंगली भडकवणे, महापुरुषांच्या नावावर वैयक्तिक दुकानदारी करणे ही प्रवृत्ती रोखण्यासाठी समाजातील सजग शक्तींनी पुढे आले पाहिजे.

शाळा-कॉलेजांमध्ये इतिहास आणि समाजशास्त्राचे चिकित्सक शिक्षण दिले गेले पाहिजे. तरुणांना विवेकाने विचार करण्याची सवय लावली पाहिजे. केवळ भावनिक आवाहनांवर नव्हे, तर तथ्यांवर विश्वास ठेवण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. माध्यमांनीही जबाबदारीने वागून सनसनाटीपेक्षा सत्याला प्राधान्य दिले पाहिजे. माणुसकीचा धर्म सर्वात मोठा महापुरुषांचे विचार हे प्रगतीचे साधन होते; ते विनाशाचे शस्त्र बनू नयेत. जातीची ओळख ही सामाजिक वास्तव असू शकते, पण ती माणुसकीपेक्षा मोठी असू शकत नाही. जर आपण धर्म, जात, पंथ यांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून उभे राहिलो नाही, तर इतिहास आपल्याला क्षमा करणार नाही. आज गरज आहे ती घोषणांची नव्हे, तर कृतीची. समाजाला आगीत ढकलणाऱ्या स्वार्थी नेत्यांना आणि खोट्या माहितीचा व्यापार करणाऱ्यांना ठामपणे नकार देण्याची. महापुरुषांच्या नावाचा सन्मान त्यांच्या विचारांच्या आचरणातूनच होईल द्वेषाच्या राजकारणातून नव्हे. जर आपण आज जागे झालो, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा विचारांचा दीपस्तंभ बनू शकतो. अन्यथा, पुढील पिढीच्या हातात आपण केवळ जातीचे सर्टिफिकेट आणि द्वेषाची भाषा सोपवू आणि तेच आपल्या पराभवाचे सर्वात मोठे प्रमाणपत्र ठरेल.

# स्वच्छता हीच सेवा हा संत गाडगे महाराजांचा संदेश आजही प्रेरणादायी-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. 'स्वच्छता हीच सेवा' हा त्यांचा संदेश आजही प्रेरणादायी आहे. गावोगावी स्वच्छतेची व्यापक चळवळ उभी करत त्यांनी समाजपरिवर्तनाची दिशा दिली. दीन-दुबळ्यांची सेवा, शिक्षणाचा प्रसार आणि समाजातील वाईट प्रथांविरोधात त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.**



बीड शहरात स्वच्छता, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. २३) राष्ट्रसंत गाडगे महाराज पुतळा परिसरात त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर अतिथी म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, गाडगे महाराजांनी अंधश्रद्धा, जातिभेद, व्यसनाधीनता आणि वाईट रूढी-परंपरांविरुद्ध कठोर भूमिका घेतली. दीन-दुबळ्यांच्या सेवेला प्राधान्य देत त्यांनी धर्मशाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे तसेच शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचावी, ही त्यांची भूमिका होती. गाडगे महाराजांचे जीवन अत्यंत साधे, परंतु विचार अत्यंत उंच होते. कृतीतून समाजाला संदेश देत त्यांनी खरी भक्ती ही समाजसेवेत असल्याचे अधोरेखित केले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घेत स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समता या मूल्यांसाठी कार्य करणे, हीच त्यांना खरी अभिवादनाची भावना ठरेल, असेही डॉ.क्षीरसागर यांनी नमूद केले. याप्रसंगी नगरसेवक शुभम धुत, मंगेश धोंगडे, राजाभाऊ पिंगळे, अशोक तांबारे, अमोल पौळ, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, प्रा. रवी शिंदे, विकास यादव, शारदाताई डुलगज तसेच प्रशांत पवार, मोहन राऊत, विक्रम वाघमारे, रमेश घोडके, सुशांत राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस प्रवासासाठी स्मार्ट कार्ड नोंदणी सुरू

## ज्येष्ठ नागरिक दिव्यांग महिला विद्यार्थी यासाठी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना आगारात अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व विद्यार्थी प्रवाशांसाठी एस.टी. बस प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. शासनाच्या निर्देशानुसार विविध सवलत धारक प्रवाशांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यासाठी जालना बस स्थानकातील आरक्षण व पासेस (वाहतूक विभाग) काउंटरवर नोंदणी प्रक्रिया सर्व करण्यात आली.**



राज्य परिवहन जालना आगारात दिनांक २३ फेब्रुवारीपासून एन सी एम सी कार्ड सुविधा प्रवाशासाठी सुरू करण्यात आलेली आहे .सदर कक्षाचे उद्घाटन विभागीय वाहतूक अधिकारी श्री सुरेश (पाटील) टकले यांच्या हस्ते करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी ज्येष्ठ नागरिक ,महिला, अपंग, विद्यार्थी , इतर प्रवासी यांच्यासाठी एनसीएमसी कार्ड ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सर्व प्रवाशांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा.या उद्घाटन प्रसंगी आगार व्यवस्थापक श्री अजिंक्य जैवळ, पत्रकार शिवाजी मस्के, अनिल राठोड वाहतूक अधीक्षक, श्री स न खान व श्री शेख वाहतूक निरीक्षक इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. जालना आगार कार्यक्षेत्रातील सर्व रा.प.म. प्रवाशांनी सदर स्मार्ट कार्डची नोंदणी करून घ्यावी, जेणेकरून भविष्यात एस.टी. बस प्रवास अधिक सुलभ व सोयीस्कर होईल, असे आवाहन जालना आगारातर्फे करण्यात आले.

# प्रा. ओमप्रसाद सारगे लिखित भौतिकशास्त्राच्या पुस्तकाचे प्रकाशन



**माजलगाव । प्रतिनिधी**

**सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. ओमप्रसाद सारगे यांनी लिखित -ीश्रिळलरींळेप ेष चरींहशारींळलरश्र झहूीळली ळप एश्रशलींीळलळीूं रपव चरसपशींळीा या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांच्या हस्ते संपन्न झाले.**

प्रा.ओमप्रसाद सारगे यांचे हे पुस्तक नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आले असून त्यामध्ये भौतिकशास्त्रातील संकल्पना सोप्या व समजण्यास सुलभ पद्धतीने मांडण्यात आल्या आहेत. भौतिकशास्त्रातील अनेक संकल्पना समजून घेण्यासाठी गणिताची भक्कम पायाभूत माहिती आवश्यक असते. हे पुस्तक त्या संकल्पना पद्धतशीरपणे स्पष्ट करते, त्यामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक सुलभ होणार आहे. बी.एस्सी., भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक तसेच भौतिकशास्त्र विषयाची आवड असलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. पवनकुमार शिंदे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, प्रबंधक डॉ. प्रशांत चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# मका खरेदी केंद्र संख्या वाढून खरेदी सुरू करा-खा.काळे

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात मका खरेदी केंद्रांची संख्या वाढवून खरेदी तात्काळ सुरू करावी तसेच जिल्ह्याला दिलेला लक्षांक वाढवावा, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे.




पत्रात नमूद केल्याप्रमाणे, जालना जिल्ह्यात यावर्षी मका पेरणी झालेले क्षेत्र सुमारे ५७,३४५ हेक्टर असून अंदाजे ६०,००० शेतकऱ्यांनी मका पिकाची पेरणी केली आहे. तसेच जिल्ह्यात अंदाजे १७ लाख क्विंटल मक्याचे उत्पादन झाल्याचा अंदाज असतानी शासनाने मका खरेदीसाठी १,००,००० क्विंटल इतका लक्षांक दिलेला आहे टप्प्याटप्प्याने मिळालेला लक्षांक केवळ ८,००० क्विंटल आहे. त्यापैकी आजपर्यंत फक्त १,४८४ क्विंटल मका खरेदी करण्यात आलेला आहे. जिल्ह्यात नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या २,२४६ असून त्यापैकी केवळ ५५ शेतकऱ्यांकडूनच मका खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात सध्या फक्त १० मका खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. जालना जिल्ह्यात मका पिकाचे सरासरी उत्पादन हेक्टरी २९.७६ क्विंटल इतके झालेले असताना खरेदीची गती अत्यंत मंद असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तात्काळ मका खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी, खरेदी प्रक्रिया वेगाने राबवावी तसेच जिल्ह्याला दिलेला खरेदी लक्षांक वाढवावा, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, त्र्यंबकराव पाबळे, भाऊसाहेब साळुंके, विलास दानवे व शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# पान १ वरून...

### मान्सूनवर एल

व्हायला सुरुवात होईल. याची शक्यता ६०% आहे. त्यानंतर, उत्तर गोलार्धात उन्हाळा संपेपर्यंत ही सामान्य स्थिती कायम राहू शकते. या अहवालानुसार, मे महिन्यापासून एल निनो येण्याची शक्यता वाढणार आहे. ही शक्यता साधारणपणे ५८ ते ६१% इतकी आहे. या काळात हवामान सामान्य राहण्यापेक्षा एल निनोचा प्रभाव पडण्याची शक्यता जास्त आहे.

-------------

### अजितदादा महाराष्ट्राला न

असलेले लक्ष त्यांना विशेष वाटायचे. ते चप्पल वापरत, पण पाय नेहमी स्वच्छ ठेवत, अशी आठवण त्यांनी सांगितली. अजितदादांचे नेतृत्व, कामातील सातत्य आणि प्रशासनातील पकड यामुळे ते वेगळे ठरले, असे फडणवीस यांनी अधोरेखित केले. मुख्यमंत्री होण्याची क्षमता असूनही ती संधी त्यांना मिळाली नाही, ही खंत त्यांनी पुन्हा व्यक्त केली. राज्याच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला ठसा कायम राहील आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र त्यांना नेहमी लक्षात ठेवेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यंदा दादांनी आपला १२ वा अर्थसंकल्प सादर केला असता आणि पुढील वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती, असे त्यांनी नमूद केले. मात्र अचानक त्यांच्या जाण्यामुळे ही परंपरा थांबली, असेही ते म्हणाले. या वेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी स्वत:वर आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस यांनी सांगितले की, अजितदादांसोबत त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते, तर ते अधिक वैयक्तिक आणि भावनिक होते. दादा माझ्यापेक्षा ११ वर्षांनी मोठे होते. खऱ्या अर्थाने ते माझे दादाच होते, असे ते म्हणाले. २०१४ नंतर दोघांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली आणि एका दशकाहून अधिक काळ परस्परांमध्ये मैत्री व सुसंवाद राहिला. सकाळी ६ वाजता कामाला सुरुवात करण्याची त्यांची सवय होती, याचा उल्लेख करत त्यांनी त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

**विलासराव, मुंडे, आबांनंतर आता अजितदादांनाही नियतीने हिरावले**

मुंबईः त्या दुर्दैवी अपघातात नियतीने अजितदादांसारखा धडाडीचा नेता आपल्यातून हिरावून नेला. महाराष्ट्रात ज्या नेत्यांकडे समाज मोठ्या आशेने बघतो, त्यांनाच हिरावून घेण्याची नियतीची ही कोणती पद्धत आहे? विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, आर. आर आबा आणि आता अजितदादांनाही नियतीने हिरावले असे मत जयंत पाटील यांनी व्यक्त केले. गेल्या ४० वर्षांपासूनचे सहकारी असलेल्या अजित पवार यांच्या आठवणींना जयंत पाटील यांनी उजाळा दिला. स्व. यशवंतराव चव्हाणांच्या मुशीतून शरद पवार साहेबांचे नेतृत्व सुरू झाले आणि त्यांचे संस्कार घेऊन अजितदादांनी आयुष्यभर काम केले. दादांची आणि आम्हा सर्वांची कारकीर्द ही एकाचवेळी सुरू झाली, असे सांगत त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला.

**...दुसरी सकाळ अंतकरणाला**

अजितदादांच्या बद्दल म्हणायचे झाले तर दोन सकाळ अशा होत्या, त्यातली एक सकाळ ही त्यांच्या कृतीने महाराष्ट्राला धक्का देणारी होती आणि दुसरी सकाळ ही महाराष्ट्राला व अंतकरणाला चटका देणारी होती, असे भावूक भाष्य विधान परिषदेत अजित पवारांच्या शोक प्रस्तावावर बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले. उद्धव ठाकरे म्हणाले की, विधिमंडळाचे या वर्षीच पहिलं अधिवेशन आणि या अधिवेशनाची सुरुवात आपण सर्वजण एक दिगमूड अवस्थेमध्ये आहोत. आजपर्यंत नेहमी सभागृहात दिसणारे आणि आपल्याला सर्वांनाच आपले वाटणारे अजितदादा या सभागृहात किंवा या विधिमंडळात आज दिसत नाही, ही खंत आपल्या सगळ्यांच्या मनात आहे. माणसे येतात, माणसे जातात, परंतु माणसे असताना त्यांचे महत्त्व आपल्याला कधी कळत नाही आणि ती नसतात त्यावेळेला त्यांचे महत्त्व काढून काही उपयोग होत नसतो. अजितदादांसारखा एक भरोसेमंद उत्तम दिलदार, केवळ सहकारीच नव्हे तर मित्र मी गमावला आहे, असे ते म्हणाले.

-------------

### जि.प., पंचायत समित्यांच्या

न होणे हेच कायदेशीर प्रक्रियेला धरून आहे. या निर्णयामुळे उरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावेळी केंद्र आणि राज्याची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, यापूर्वी महाराष्ट्रातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या आहेत, त्या न्यायालयाच्या निर्णयाला अधीन राहूनच घेण्यात आल्या होत्या. मात्र, ज्या ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जाण्याचा धोका होता, तिथे निवडणुका थांबवण्यात आल्या आहेत. राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समित्यांत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळे या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. नुकत्याच १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. आता राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयाने मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने अशी परवानगी देता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

------------

### मविआच्या बैठकीला

पाटील शशिकांत शिंदे जितेंद्र आव्हाड उपस्थित राहतात. मात्र, काल समन्वयाच्या अभावामुळे महत्त्वाचे नेते अनुपस्थित राहिले. यांच्या अनुपस्थिती संदर्भात कारणे जाणून घेतली असता साता-यामध्ये एका विवाह सोहळ्यानिमित्त जयंत पाटील, शशिकांत शिंदे असल्याने जितेंद्र आव्हाड यांना महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेला जाण्याचे पक्षाकडून सांगण्यात आले होते. मात्र, जितेंद्र आव्हाड सुद्धा आपल्या वैयक्तिक कारणात व्यग्र असल्याने आणि आमदार रोहित पवार दिल्लीत असल्याने त्यांनी महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेला दांडी मारली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा एकही नेता न आल्याने महाविकास आघाडीमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

-------------

### शेतकऱ्यांच्या संसारावर

आहे, असे शेट्टी यांनी म्हटले आहे. रत्नागिरी ते नागपूर हा महामार्ग सध्या अस्तित्वात असून तो तोट्यात चालला आहे. या महामार्गाला समातंर शक्तिपीठ महामार्ग करण्याचा घाट घातला जात आहे. राज्य सरकार आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरीत निघण्याच्या मार्गावर आहे. राज्यातील कंत्राटी कामगारांचे पगार थकीत आहेत. ठेकेदारांची ८० हजार कोटींची देणी आहेत. जलजीवन योजनेतील हजारो कोटींची देणी थकीत आहेत. कृषी विभागातील यांत्रिकीकरण आणि अन्य विभागांची अनुदाने प्रलंबित आहेत, असे असताना राज्यातील जनतेवर १ लाख कोटींचा कर्जाचा बोजा टाकून या महामार्गाची उभारणी कशासाठी? असा सवाल शेट्टी यांनी केला आहे.

---------

### भारतातील ९०% कफ

होत्या किंवा त्यांना तात्पुरते ऑपरेशन थांबवण्यास भाग पाडले गेले हे सांगण्यास नकार दिला. भारताच्या औषध नियामकाचे उद्दिष्ट कर्मचाऱ्यांची कमतरता दूर करून, मंजुरी जलद करून आणि संसाधने वाढवून त्यांचे कामकाज अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाच्या बरोबरीने आणण्याचे आहे, असे रघुवंशी म्हणाले.

--------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६



## थोडक्यात

## हिस्ट्री रिपीट करेंगे, हिस्ट्री डिफीट करेंगे ......

काल दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना एकतर्फी हरल्यापासून करमत नाहीये.खूप निराश केले भारतीय फलंदाजानी, शिवम दुबे वगळता कुणीही थोडीही छाप पाडू शकले नाही.गोलंदाजीत पण बुमराह सोडला तर बाकीनी निराश केले,दोन्ही आघाड्यांवर अशी कामगिरी म्हणजेच पराभव आणि तो काल झाला. सलग १३ सामने जिंकणारा संघ काल हरला,तुमचे कालचे विक्रम




... त्या पुण्याईवर जिंकता ... राभवातून शिकला तरच ... ट करेंगे,हिस्ट्री डिफीट ... ांभीर्याने खेळत लक्षात ... म्हणून नाही तर संघ ... अक्षर का बसवला अन ... मान्य क्रिकेट रसिकाला ... दिवस यजमान संघासाठी ... संघ सुद्धा अवघ्या ९५ धावांवर बाद झाला, तिथे पण नक्कीच नैराश्य पसरले असेल.आता या दोन्ही यजमानांना आपले दोन्ही सामने मोठ्या फरकाने जिंकावे लागतील. वाईट याचे वाटते की गोलंदाजांनी चांगली सुरवात करून पण नंतर मिलर,ब्रेव्हीस,स्टब यांनी आफ्रिकेला मोठी धावसंख्या रचून दिली तेही ३ बाद २० नंतर आणि आपण १७९ धावांचा पाठलाग करतांना जी घाई केली ती नेमकी कशामुळे? हे अनाकलनीय आहे. आता संघ निवड मुळातच चुकली म्हणायला पण वाव नाही आणि अर्थही नाही.धावांचा पाठलाग करतांना काल विराट कोहलीची आठवण झाली, तो एका बाजूने जसा शांत चित्ताने खेळून धावा अवक्यात आल्यावर आक्रमक होतो तसा मुळात शांतपणाच कुणी दाखवला नाही, ज्याला त्याला उतुंग फटाके मारून सामना जिंकायचा होता,सामान तर गेलाच पण मापात मोठे अपयश टाकून.जे झाले ते झाले आता उर्वरित दोन सामन्यात तरी आपल्या एकूणच रणनीतीचा साकल्याने फेरविचार करून मैदानात उतरायला हवे.सुपर ८ मधील कोणत्याच संघाला कमी लेखून चालणार नाही. साऱ्यांनीच आक्रमक पवित्रा घेण्याऐवजी काहींनी खेळपट्टीवर ठामपणे उभे राहिले पाहिजे. आपला संघ विश्वविजेता होऊ शकण्याच्या क्षमतेचा नक्कीच आहे, एका पराभवाने आपले खेळाडू पण खचणार नाहीत याची खात्री आहे, तेव्हा उर्वरित सामन्यासाठी आणि फायनलमध्ये पोहचण्यासाठी पुनश्च मनःपूर्वक शुभेच्छा...



**– महेश वाघमारे, बीड.**

# बांधकाम कामगार योजनेचा बोजवारा बोगस दाखले आणि दलालांचा सुळसुळाट!

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पाटोदा परिसरात सध्या मोठा काळाबाजार सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ग्रामसेवकांचे बनावट सही-शिक्के वापरून बोगस नोंदणी केली जात असून, कामगार कल्याण अधिकारी सुधाकर कोनाळे यांचे कार्यालय जणू एजंटांच्या ताब्यात गेल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

बनावटगिरीचा 'पाटोदा पॅटर्न'

गेल्या अनेक महिन्यांपासून स्थानिक ग्रामसेवकांनी कामगार नोंदणी अर्जांवर अधिकृत स्वाक्षरी किंवा शिक्के देणे बंद केले आहे. मात्र, हीच संधी साधून गावागावातील काही सीएससी सेंटर चालक आणि दलाल सक्रिय झाले आहेत. या दलालांनी चक्क ग्रामसेवकांचे बनावट रबरी शिक्के आणि हुबेहूब स्वाक्षरी तयार केली असून, त्याद्वारे बोगस प्रमाणपत्रे वाटली जात आहेत.

श्रीमंतांची चंगळ, गरीबांची वणवण

ज्यांच्याकडे भरभक्कम संपत्ती आहे, अशी धनदांडगी मंडळी दलालांच्या मदतीने स्वतःची आणि आपल्या नातेवाईकांची 'बांधकाम कामगार' म्हणून नोंदणी करत आहेत. शैक्षणिक शिष्यवृत्तीपासून ते विविध अर्थसाहाय्य योजनांपर्यंत सर्व लाभ अधिकारी आणि दलालांच्या संगनमताने लाटले जात आहेत. या भ्रष्ट साखळीत 'लक्ष्मी दर्शन' (अर्थात आर्थिक देवाणघेवाण) होत असल्याने, पात्र आणि गरजू कामगारांचे अर्ज मात्र त्रुटी काढून प्रलंबित ठेवले जात आहेत.

अधिकारी निद्रेत की संगनमताने?

कामगार कल्याण अधिकारी सुधाकर कोनाळे यांच्या कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यालयातील महत्त्वाची कामे आणि फाईल्स चक्क एजंटांच्या हातात असल्याचे पाहायला मिळत आहे. भ्रष्टाचाराच्या या महाजालामुळे वैध लाभार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागत असून, खऱ्या मजुरांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे.

कारवाईची मागणी

या बोगसगिरीची सखोल चौकशी करून संबंधित दलाल, सीएससी सेंटर चालक आणि दोषी अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा, खऱ्या कामगारांच्या हक्कावर असाच दरोडा टाकला जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

तुम्हाला या संदर्भात वरिष्ठ जिल्हा प्रशासनाकडे किंवा कामगार आयुक्तांकडे तक्रार करण्यासाठी अर्जाचा मसुदा हवा आहे का?

## संत गाडगेबाबांनी आयुष्यभर झाडूने परिसराची तर, कीर्तनाने मस्तकांची स्वच्छता केली –सखाराम वनवे

वडवणी । प्रतिनिधी

संत गाडगेबाबांनी आपल्या जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत समाजसेवेचा जो ध्यास..!आणि वसा..!हाती घेऊन समाजसेवा करण्याचा विडा उचलून,आयुष्यभर समाजातील असणाऱ्या अनिष्ट अशा वाईट रूढी-परंपरा या गोष्टींना छेद देत. समाज जागृतीचे,त्याचबरोबर शिक्षण आणि स्वच्छता यांचे महान असे कार्य संत गाडगेबाबांनी यांनी त्यांच्या जवळ असलेल्या झाडू आणि मडके या संपत्तीवरच आयुष्याभर सेवा केली.अशा संत गाडगेबाबांनी त्यांच्याजवळ असलेल्या झाडूने आसपासच्या परिसराची स्वच्छता करून, संध्याकाळी माणसाच्या मस्तकाची घाण कीर्तनाच्या माध्यमातून समाजाचे (डोक्यामध्ये) असणारे वाईट विचार रुढी-परंपरा याची



स्वच्छता करत.आयुष्यभर संत गाडगे बाबांनी अलौकिक कार्य केले.अगदी तशाच प्रकारचे विद्यार्थ्यांना सुद्धा..!विद्यार्थी दशेमध्ये स्वच्छतेचे महत्त्व जाणून आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ करण्याची सवय अंगीकारले पाहिजे, सर्वांनी व्यसनमुक्त राहिले पाहिजे असे मार्गदर्शन मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांनी उपस्थित सर्वांना केले.आज २३ फेब्रुवारी संत गाडगेबाबा यांची जयंती चे आयोजन शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण(कांदेवाडी)ता.धारूर जि.बीड या शाळेचे मुख्याध्यापक श्री सखाराम वनवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शाळेतील विद्यार्थ्यांनी पूजा साबळे,शामला वागतकर,रेखा अंभुरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याला उजाळा दिला.शाळेतील प्राथमिक शिक्षक श्री संभाजी मुसळे सर,श्री.नागनाथ भरडे सर, माध्यमिक शिक्षक श्री.मारूती राठोड सर यांनी सुद्धा...!विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.शाळेचे स्वच्छता दूत असणारे श्री.राजेभाऊ निरडे यांच्या अलौकिक अशा स्वच्छतेच्या कार्यासाठी मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानीत करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.भारत बडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक श्री.राहूल करे सर यांनी मानले.या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक श्री.नागनाथ चात्रे,श्री.व्ही.व्ही कुलकर्णी, श्रीमती.शकुंतला गायकवाड मॅडम,श्रीमती.पूनम लांब मॅडम, श्री.हनुमान केंद्रे,आदी मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

## संतभूमी अर्बनमध्ये शिवजयंती उत्साहात



बीड । प्रतिनिधी

संतभूमी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.,बीड मुख्य कार्यालय बीड. येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अर्जुन राऊत, व्यवस्थापकीय संचालक (चऊ) श्री. ज्ञानेश्वर राऊत, संचालक मंडळातील सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यालय परिसर आकर्षक सजावटीने नटलेला होता तसेच शिवरायांच्या विचारांचे फलक लावून प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष श्री. अर्जुन राऊत व चऊ श्री. ज्ञानेश्वर राऊत यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. घोषणांमुळे कार्यक्रमाला एक वेगळाच उत्साह लाभला आणि उपस्थितांमध्ये शिवभक्तीची भावना जागृत झाली. यानंतर कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संस्थापक अध्यक्ष श्री. अर्जुन राऊत यांनी शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्य स्थापनेची जिद्द आणि लोककल्याणकारी प्रशासन यांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवरायांनी केवळ स्वराज्य निर्माण केले नाही तर आदर्श शासनव्यवस्थेची पायाभरणी केली. त्यांच्या नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि प्रजेसाठी असलेले प्रेम हे आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या मूल्यांचा आदर्श समोर ठेवून संतभूमी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीची वाटचाल अधिक सक्षम व भक्कम करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. श्री. राऊत यांनी पुढे नमूद केले की, सहकार क्षेत्रात कार्य करताना प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता या तत्त्वांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. शिवरायांच्या प्रेरणेतून संस्थेचा सर्वांगीण विकास साधत ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच संस्थेच्या प्रगतीत सर्व घटकांचा सहभाग महत्त्वाचा असून एकजुटीच्या बळावर संस्था निश्चितच नवीन उंची गाठेल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिवरायांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संस्थेच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. प्रसाद वितरणानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रसंत गाडगे बाबा जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्र संत गाडगे बाबा (जन्म :- शेंडगाव ता-दर्यापूर जि-अमरावती २३ फेब्रुवारी १८७६; मृत्यू - , २० डिसेंबर १९५६ वलगाव जवळ अमरावती) गाडगे बाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधारक आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे. असे संत मानवतेचे संदेश देणारे अतिशय सोप्या भाषेत ज्ञान देणारे महाराष्ट्र भूमितील थोर संत महात्मा राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु तालुका वडवणी जिल्हा बीड येथे उत्साहात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी



विद्यालयाचे प्राचार्य श्री सारोक्ते डी जी सर व उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून श्री . बापू गावडे बाबा माजलगाव व उपस्थित सर्व पालक वर्ग मान्यवर व्यक्ती आदींच्या शुभहस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पावन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व विनम्र अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना संत महात्मा राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या विषयी माहिती दिली व त्याच बरोबर बहुमोल मार्गदर्शन केले या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते सर्वांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पावन प्रतिमेस जयंती निमित्त विनम्र अभिवादन केले त्याचबरोबर विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी गाडगे बाबा विषयी त्यांनी दिलेल्या तत्त्वज्ञान त्यांच्या कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच उपस्थित सर्व मान्यवर व शिक्षक वृंद यांनीही आपले मनोगत व्यक्त करत सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व गाडगे बाबा विषयी सखोल अशी माहिती देण्यात आली सदरील कार्यक्रमास उपस्थित सर्व शिक्षणप्रेमी, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, सर्व पालक वर्ग, प्रमुख पाहुणे विद्यालयातील घाडगे सर, टाले सर, हंगे ,सर यादव सर, येवले सर, चोपडे सर, मुंडे सर, तौर मॅडम, गोंदरे जी एम आदी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते शेवटी विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख चोपडे सर यांनी सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन स्वयंरोजगार क्षेत्रात आपली ओळख निर्माण करावी –प्रो. डॉ. सतीष दांडगे

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

काळाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी रोजगारभिमुख शिक्षण घेऊन स्वयंरोजगार क्षेत्रात आपली ओळख निर्माण करावी. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयाद्वारे आयोजित केलेल्या संस्कृती कार्यक्रमांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पाहिजे. असे मत प्रो. डॉ.सतीष दांडगे यांनी व्यक्त केले तर आजच्या आधुनिक युगाची दिशा लक्षात घेता सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक व व्यावसायिक स्तरावर सक्षमपणे नेतृत्व करण्याची क्षमता विकसित करण्याबरोबरच स्वयंरोजगारक्षम व उद्योगक्षम विद्यार्थी घडविण्याचे ध्येय तुलशी शिक्षण समूहाचे आहे. असे प्रतिपादन तुलशी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील तुलसी शिक्षण समूहाचे पारमिता शिक्षण संस्था संचलित मॉडर्न महाविद्यालय व जोशोबा शिक्षण संस्था संचलित विक्रमशीला फॅशन डिझाईन महाविद्यालयाचा संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे उद्घाटक म्हणून प्रो. डॉ. सतीष दांडगे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलशी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजी नगरचे स्मार्ट सिटी प्रकल्पाचे उपायुक्त रवींद्र जोगदंड विश्वस्त निशिगंध बनाटे, बंधन शिर्से, उद्योजिका अर्चना घोरपडे उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. नामदेव सानप, प्राचार्या स्वप्नाली सुतार, प्राचार्या शितल निकाळजे, प्राचार्य कृष्णा कांबळे उपस्थित होते. आपल्या उद्घाटनपर भाषणात पुढे बोलताना प्रो.डॉ. सतीश दांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आपला सहभाग वाढवून ज्ञानाच्या मुळापर्यंत गेले पाहिजे.




अध्यापकांनी सातत्याने चिंतन मनन करून विद्यार्थ्यांशी निरंतर संवाद साधला पाहिजे. महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यासपीठ मिळून दिले जाते त्यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पाहिजे. प्रा. रोडे सरांच्या नेतृत्वाखाली तुलशी शिक्षण समूहाने अत्यल्पकाळात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. असेही प्रो. डॉ. दांडगे यांनी म्हटले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना तुलशी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, आधुनिक युगाची गरज लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या अंगी सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक व व्यवसायीक जबाबदारी बरोबरच स्वयंरोजगारक्षमता निर्माण व्हावी व उद्योजक क्षमता विकसित व्हावी यावर विशेष भर दिला जातो. शैक्षणिक प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या मालाचे बाजारपेठेत अद्यावत दालन निर्माण करून विद्यार्थ्यांच्या अंगी व्यवसाय कौशल्य निर्माण व्हावे यासाठी ना नफा ना तोटा धरतीवर राज्यातील पहिले विद्यार्थी उत्पादित फॅशन डिझाईन मालाचे व्यावसायिक दालन तुलशी समूहाच्या वतीने सुरू करण्यात येत आहे. संगणक शास्त्राच्या पदवी अभ्यासक्रमाबरोबरच आधुनिक संगणक तंत्रज्ञानाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. शिक्षण व प्रशिक्षणातून विद्यार्थी हा स्वयंरोजगारक्षम आणि उद्योजकक्षम निर्माण करण्याचे ध्येय तुलशी समूहाचे आहे. असेही प्रा.प्रदिप रोडे यांनी म्हटले. याप्रसंगी उपायुक्त रवींद्र जोगदंड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपली कौटुंबिक सामाजिक जबाबदारी ओळखून कठोर परिश्रम घेऊन भविष्य घडवावे. यावेळी उद्योजिका श्रीमती अर्चना घोरपडे विश्वस्त श्री बंधन शिरसे यांनी समयोचित भाषणे केली. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज ,छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे आणि यशवंतराव चव्हाण यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रारंभी प्राचार्य डॉ. नामदेव सानप, प्राचार्या स्वप्नाली सुतार यांनी महाविद्यालयाचा वार्षिक आढावा सादर केला. प्रा. संतोष प्रधान प्रा. हर्षद वाघमारे प्रा.राजेंद्र भगत, प्रा. ज्योती मोरे प्रा डॉ प्रज्ञा किवंडे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. दुसऱ्या सूत्रात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात सादर केले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते परितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेंद्र भगत कार्यक्रम समन्वयक प्रा. ज्योती मोरे प्रा. डॉ. अस्मिता साळवे प्रा. नबीहा खान प्रा. हर्षल वाघमारे प्रा. संतोष प्रधान प्रा. डॉ. प्रज्ञा किवंडे प्रा. प्रवीण पावहारे प्रा. तुबा सय्यद ,पवन मस्के प्रा.उत्कर्षा इंगोले, प्रा. संध्या बागुल प्रा. संजना खरात प्रा. भाग्यश्री कांबळे प्रा. समृद्धी नेवदे, श्री प्रतीक पाटील ,प्रज्ञा खरात कविता वावळे वंदना ठोंबरे भिमाबाई मुनेश्वर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. अस्मिता साळवे रोहन त्रिभुवन, साक्षी पातरफळे प्रा. तुबा सय्यद प्रा. प्रवीण पावहारे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.या कार्यक्रमास बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### आष्टीच्या कृषी प्रदर्शनाला

मा. ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री आ. प्रकाश सोळंके, माजी आ. अमरसिंह पंडित यांनी यानवेळी कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थिती न दिल्याने आणि या कृषी प्रदर्शनात शेतकरी यांची संख्या कमी दिसत आहे. पण संस्थेतील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर संख्या दिसून येत असून या कृषी प्रदर्शनाचा लाभ संस्थेतील विद्यार्थी व प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक,कर्मचारी हेच घेत असल्याचे शेतकरी व तालुक्यातील जनतेतून बोलले जात आहे.

आष्टी येथील तालुका स्तरीय कृषी प्रदर्शन आयोजित केले आहे ते माजी आ भिमराव धोंडे यांनी स्वतः भरवले आहे या प्रदर्शनाला शासनाकडून अनुदान दिले जात नाही जे जिल्हा स्तरावरील कृषी प्रदर्शन असते त्यांना शासनाचे अनुदान दिले जाते.

– गोरक तरटे

तालुका कृषी अधिकारी आष्टी

### बीड शहराच्या ऐतिहासिक

ओळखली जाते. विशेष म्हणजे जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत लेटरहेडवर दिपमाळ हे मुख्य चिन्ह म्हणून वापरले जाते. त्यामुळे या वास्तूचे महत्त्व केवळ ऐतिहासिक मर्यादेत न राहता प्रशासकीय स्तरावरही अधोरेखित होते.

दिपमाळेचे संवर्धन पूर्ण झाल्यानंतर शहराचा ऐतिहासिक वारसा अधिक मजबूत होणार असून नागरिकांमध्येही या वारशाबाबत अभिमानाची भावना निर्माण होत आहे. भविष्यातील पिढ्यांना आपल्या शहराचा गौरवशाली इतिहास प्रत्यक्ष पाहता यावा, यासाठी अशा ऐतिहासिक वास्तूंचे जतन-संवर्धन आवश्यक असल्याची भावना जाणकार नागरिक आणि इतिहासप्रेमींमधून व्यक्त केली जात आहे.

आपला शौर्याचा अस्तित्व टिकवायचं असेल तर आपला ऐतिहासिक वारसा टिकायला हवा बीड शहराला तो वारसा लाभलेला आहे हा शौर्याचं अस्तित्व टिकवायचं असेल तर ऐतिहासिक वारसा आपण बीडकरांकडून तो जपला गेला पाहिजे. मात्र बीडमधील या वारशाकडे जिल्हा प्रशासन व पुरातत्व खात्याचं दुर्लक्ष होत असून वाढत्या जमिनीच्या किमतीत भूमाफियांचे प्रकार घडत आहेत.-रामनाथ खोड, सामाजिक कार्यकर्ता

### पत्रकारांच्या सुविधासाठी

पत्रकार परिषदेने केलेल्या कार्यक्रमाचा आढावा आणि शासनाकडे केलेला पाठपुरावा परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे यांनी प्रस्ताविकात येथे सांगितला. तर विश्वस्त किरण नाईक यांनी संघटनेच्या पूर्णता स्थापने पासून आता डिजिटल पत्रकारांच्या कार्याचा आढावा घेतला.

रायगड जिल्ह्यातील प्रेस क्लबच्या कार्याचा आढावा व नियोजन व्यवस्था उत्तम करणाऱ्या कर्जत प्रेस क्लब चे आभार मानत असल्याचे परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर यांनी येथे स्पष्ट केले.

तर प्रमुख पाहुणे न्यूज मराठी चे संपादक मंदार फणसे यांनी कधीही एकत्र येणाऱ्या पुढाऱ्यांच्या वृत्तीचा अनुभव घेत पत्रकारांनीही एकत्र यावे असे आवाहन येथे केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने यावर्षी दिल्या गेलेला पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ म्हणून जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार यंदा परभणी जिल्हा पत्रकार संघाला मान्यवराचे हस्ते देण्यात आला. तर राज्यातून तालुका स्तरीय

वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार पुढील पत्रकार संघाना देण्यात आले. व रायगड प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष अभय आपटे, व मुरुड तालुका प्रेस क्लब यांचे विशेष सत्कार सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले. आपल्या अध्यक्ष भाषणामध्ये परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी पुढील मराठी पत्रकार परिषदेचे दिवार्षिक अधिवेशन उदगीर येथे होणार असल्याचे जाहीर केले यासोबतच पत्रकारांपुढील आव्हाने समस्या यासाठी जागृत राहून नवी आव्हाने स्वीकारली पाहिजे असे आव्हान त्यांनी पत्रकारांना केले

या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या

आयोजनासाठी कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार, कार्याध्यक्ष विलास श्रीखंडे, सल्लागार विजय मांडे, अजय गायकवाड, राहुल देशमुख, अनिल गवळे , विदयानंद ओव्हाळ, मल्हार पवार, विपुल माळी, आनंद सकपाळ यासंह अनेक पत्रकार यांनी उत्तम आयोजन नियोजन केले.

### महादेव कोळी समाजाच्या

नियमांनुसार महादेव कोळी समाज अनुसूचित जमातीमध्ये (डढ) मोडतो, मात्र पडताळणी समिती आणि स्थानिक प्रशासनाकडून वारंवार पुराव्यांची मागणी करून अडवणूक केली जाते असा आरोप वारंवार केला जातो. माजलगावच्या प्रकरणाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, आंदोलनाशिवाय प्रशासन कामाला लागत नाही.

आता संपूर्ण समाजाचे लक्ष प्रशासनाच्या पुढील ८ दिवसांतील कार्यवाहीकडे लागले आहे. जर या कालावधीत प्रमाणपत्रे मिळाली नाहीत, तर माजलगाव तहसील किंवा उपविभागीय कार्यालयावर पुन्हा एकदा जनआंदोलन धडकणार, हे निश्चित दिसत आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६
४

# शेतकरी हाच तंत्रज्ञानाचा केंद्रबिंदू-कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## कृषी क्षेत्रातील एआय अ‍ॅप्सचे लोकार्पण व सामंजस्य करार


आजचा काळ तंत्रज्ञानाचा असला तरी कृषी क्षेत्राच्या तंत्रज्ञानात शेतकरी हाच केंद्रबिंदू असला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, आयओटी यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाला शेतकऱ्यांच्या पारंपरिक ज्ञानाशी जोडल्यास महाराष्ट्राची शेती देशासह जगासाठी आदर्श ठरू शकते, असा विश्वास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी व्यक्त केला.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्राने २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी एआय आधारित कृषी धोरण राबवून देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. यासाठी सुमारे ५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. 'महाविस्तार' अ‍ॅपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत वैयक्तिक सल्ला, बाजारभाव, हवामान माहिती




आणि विविध योजनांचे मार्गदर्शन केले जात आहे. आतापर्यंत ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी हे अ‍ॅप डाउनलोड केले आहे. एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अन्नसुरक्षा, हवामान बदलाशी सामना, महिला सशक्तीकरण आणि शाश्वत शेती साध्य करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. तसेच, एआय अँड अ‍ॅग्रीटेक इनोव्हेशन सेंटर स्थापन करून प्रत्येक जिल्ह्यात शेतकऱ्यांपर्यंत एआय आधारित सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. आजचा शेतकरी केवळ कुटुंबापुरता मर्यादित न राहता देश आणि जगाच्या अन्नसुरक्षेत महत्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगून एआय तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे जीवन अधिक सक्षम, सुरक्षित आणि समृद्ध होईल, असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. राज्यातील शेती क्षेत्र हे अधिक आधुनिक, तंत्रज्ञानस्नेही आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त करण्याच्या दृष्टीने कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित महत्वपूर्ण अ‍ॅप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यामध्ये महा एजी एक्स (महा-अ‍ॅग्री डेटा एक्स्चेंज) हा राज्याचा महत्वकांक्षी डेटा प्लॅटफॉर्म असून, कृषी क्षेत्रातील माहिती सुरक्षित पद्धतीने एकत्रित करून संशोधन, नवोन्मेष आणि धोरणात्मक निर्णयांसाठी वापरण्याचा मार्ग मोकळा करणार आहे. हा प्लॅटफॉर्म नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून विकसित करण्यात आला आहे. तसेच भीली आदिवासी भाषेसाठी लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) लाँच करण्यात आले असून, स्थानिक आदिवासी भाषेत कृषी विषयक माहिती आणि सल्ला उपलब्ध करून देण्याचा हा पहिला प्रयत्न आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली, भाषिणी आणि एक-स्टेप संस्थेच्या सहकार्याने हे मॉडेल विकसित करण्यात आले आहे. याशिवाय महाविस्तार व्हॉइस टेलिफोनी अ‍ॅप सादर करण्यात आले. स्मार्टफोन नसलेल्या शेतकऱ्यांनाही फोनद्वारे शेतीविषयक प्रश्नांची उत्तरे मिळावीत, हा या अ‍ॅपचा मुख्य उद्देश आहे. महाविस्तार एआय आधारित कीड व रोग ओळख प्रणाली देखील यावेळी सादर करण्यात आली. पिकांच्या छायाचित्रांच्या आधारे कीड व रोग ओळखण्यास मदत करणारे हे अ‍ॅप शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## शेतीसाठी उत्कृष्ट कोंबडी खत; जाणून घ्या फायदे आणि वापर पद्धती!



**जमिनीची कमी होत जाणारी सुपीकता आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यामुळे जास्तीत जास्त शेतकरी शेतात सेंद्रिय खतांचा वापर करण्याकडे भर देत आहेत. सेंद्रिय खताचे वेगवेगळे प्रकार शेतकर्यांना माहित आहेत. त्यामध्ये कोंबडी खत हा एक सहज उपलब्ध होणारा आणि चांगला पर्याय आहे. कोंबड्यांची विष्ठा, कोंबड्यांच्या लिटरसाठी वापरलेला लाकडाचा भुस्सा, साळीचा भुस्सा, शेंगाची टरफले इ. सर्व घटक कुजल्यानंतर तयार झालेला पदार्थ म्हणजे 'कोंबडी खत'.**

**कोंबडी खताचे फायदे :**

कोंबडी खत वापरल्याने मातीची भौतिक, रासायनिक व जैविक क्षमता सुधारते. बागायती पिके जसे ऊस, फळपिके आणि फुलझाडे कोंबडी खतास चांगला प्रतिसाद देतात. कोंबडी खतामध्ये मुख्यत: १३ अन्नद्रव्ये असतात. त्यात नत्र व स्फुरद जास्त प्रमाणात असते. कोंबडी खतातील नत्र हे अमोनिया, नायट्रेट, युरिक ॲसिड या प्रकारांत आढळते. मुख्य अन्नद्रव्यांव्यतिरिक्त कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर, सोडिअम, फेरस, मंगल, मॉलिब्डेनम, बोरॉन, झिंक, कॉपर इत्यादी अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. शेणखतासारखा कोंबडी खतामुळे तणांचा प्रादुर्भाव होत नाही.

**कोंबडी खताचा शेतात वापर:**

मशागतीच्या वेळी पेरणीपूर्वी एक ते दीड महिना अगोदर कोंबडी खत जमिनीत मिसळावे. यानंतर कुळवाची पाळी द्यावी; मात्र ताजे कोंबडीखत उभ्या पिकांत जमिनीत मिसळू नये. उभ्या पिकांत कोंबडीखत जमिनीत मिसळण्यापूर्वी प्रथम त्यावर एक महिना पाणी मारून रापून किंवा थंड होऊ द्यावे म्हणजे कोंबडी खताचे कर्ब : नत्र गुणोत्तर कमी होऊन त्यातील अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होतात. कोंबड्यांच्या शेडमध्ये कोंबड्यांची विष्ठा, मूत्र, गव्हांडा किंवा भाताच्या तुसावर पडून खत तयार होते, त्यामुळे ताज्या कोंबडी खताचे कर्ब : नत्र गुणोत्तर जास्त असते. असे खत उभ्या पिकांत जमिनीत मिसळताना ओलावा असणे गरजेचे आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नसेल तर पीक पिवळे पडते, त्यामुळे ताजे कोंबडीखत थेट पिकांसाठी वापरू नये. उभ्या पिकांत पूर्ण कुजलेले कोंबडीखत वापरावे. खताचा रंग भुरकट, तपकिरी, काळपट असावा. वास मातकट असावा. खताचा सामू ६.५- ७.५ दरम्यान असावा. कोंबडी खताच्या कणांचा आकार ५ ते १० मिमी असावा. कर्ब नत्र गुणोत्तर १:१० ते १:२० दरम्यान असावे. कोंबडी खताची जलधारणाशक्ती ३० टक्क्यांपेक्षा जास्त असावी.

## अस्तरीकरण करून शेततळ्यात उन्हाळ्यातही टीकवा पाणी




**टंचाईच्या काळात फळबागा वाचविण्यासाठी शेततळ्यातील पाण्याचा वापर केला जातो. बऱ्याच वेळा उन्हाळ्यापर्यंत शेततळ्याती पाणी टिकून राहत नाही. कारण शेतकरी शेततळे खोदल्यानंतर त्यामध्ये आस्तरिकरण करत नाहीत. अस्तरीकरणामुळे शेततळ्यात पाण्याचा सुरक्षित साठा उपलब्ध होतो. त्यामुळे शेततळ्यात आस्तरिकरण करणं गरजेचं आहे. ज्या जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता अत्यंत कमी आहे. तसच पाणी पाझरण्याचा वेगही प्रचंड आहे. त्या ठिकाणचे पूर्ण भरलेले शेततळे काही दिवसांत कोरडे होते. अशा शेततळ्यातून अपेक्षित फायदा होत नाही. अशा शेतततळ्यातील पाझर कमी करण्यासाठी शेततळ्यास अस्तरीकरण करावं.**

शेततळ्यातील पाणी जमिनीमध्ये मुरून वाया जाऊ नये.यासाठी विशेष प्रकारच्या ५०० मायक्रॉन दर्जाच्या प्लॅस्टिक फिल्मचा अस्तरीकरणासाठी वापर करावा. प्लॅस्टिकचे कापड शेततळ्यात पसरताना मुरमाची किंवा मातीची अणकुचीदार टोके वर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. त्याकरिता सुक्या मातीचे किंवा वाळूचे थर पसरावेत. त्यावर प्लॅस्टिकचे कापड घड्या पडणार नाही या पद्धतीने टाकावे. अस्तरीकरणासाठी वापरण्यात येणारा प्लॅस्टिक कागद आयएसआय माणक प्रमाणे असावा. बांधापासून तळ्याच्या सर्व बाजूने १.५ बाय १.५ बाय १.५ चा चर खेदून घ्यावा. त्यात लायनिंग ची वरिल बाजू गाडून टाकता येते. याला ॲकरिंग म्हणतात. यामुळे लायनिंग ची हालचालयामुळे लायनिंग ची हालचाल होत नाही व ते जास्त काळ टिकण्यास मदत होते. शेततळ्याला कुंपण घालणे अत्यावश्यक आहे. कुंपण नसल्यास वन्य प्राणी तलावात शिरण्याचा व अपघात होण्याचा धोका असतो. खोदाई पूर्ण झाल्यावर शेततळ्यातील साफसफाई व प्लॅस्टिक फिल्म अस्तरीकरणास योग्य तळ,सर्व बाजू उतार व माथा इत्यादींचे ड्रेसिंग, फिनिशिंग करावे. पाण्याच्या वजनामुळे प्लॅस्टिक फिल्म खाली घसरणार नाही याची काळजी घ्यावी.त्यासाठी फिल्म शेततळ्याच्या काठापासून बंद करून संपूर्ण शेततळ्यात बसवावी. फिल्ममुळे शेततळ्यात साठवलेले पाणी जमिनीमध्ये मुरत नाही. शेततळे तयार झाल्यानंतर बऱ्याचदा जनावरे कापड चावून खराब करतात. तसेच गाई किंवा म्हशीसुद्धा शेततळ्यात पडण्याची शक्यता असते. हे सर्व टाळण्यासाठी शेततळ्याच्या चारही बाजूंनी तारेचे किंवा झाडे लावून सजीव कुंपण करावे. अशा प्रकारे शेततळ्याचे आस्तारिकरण केल्यास शेततळ्यातून उन्हाळ्यातही अपेक्षित फायदा मिळवता येतो.

## उडीद शेती करताना अशी घ्या काळजी; उत्पादनात होईल वाढ



उडीद हे कडधान्य पिकांपैकी एक आहे. हे असे पीक आहे, ज्यामध्ये पोषक तत्वांचा मोठा साठा आहे. उडीद डाळ आणि मसूरापासून बनवलेल्या अनेक पदार्थांच्या रूपात सेवन केले जाते. यामध्ये प्रथिने, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, नियासिन, थायामिन आणि रिबोफ्लेविन भरपूर प्रमाणात असते.उडीद पीक ७० ते ७५ दिवसांत पक्व होण्यास तयार होते, त्यामुळे उडीद लागवडीतून शेतकऱ्यांना कमी वेळेत चांगला व दुप्पट नफा मिळतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी शास्त्रज्ञांनी उडीद लागवडीशी संबंधित काही गोष्टी सांगितल्या आहेत. उडीद लागवडीसाठी शास्त्रज्ञांनी महत्त्वाच्या गोष्टी सांगताना शेतकऱ्यांना सांगितले आहे की, शेतकरी बांधवाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर उडीद पिकातून चांगले उत्पन्न मिळते. उन्हाळी हंगाम उडीद लागवडीसाठी योग्य आहे. एप्रिलचा पहिला आठवडा लागवडीसाठी योग्य काळ मानला जातो. त्याचबरोबर ३० ते ४० डिग्री दरम्यानचे तापमान उडीद लागवडीसाठी योग्य मानले जात असल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले आहे. मातीबद्दल बोलायचे झाले तर उडीद पिकाच्या लागवडीसाठी माध्यम ते भारी जमीन योग्य मानली जाते, तसेच या जमिनीत पाण्याचा निचराही चांगला असावा. पाणी साचून राहणारी जमीन याला चालत नाही. त्याचबरोबर जमिनीतील आर्द्रतेनुसार पाणी द्यावे. जर माती खूप कोरडी असेल तर आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे. अन्यथा १५ दिवसांच्या अंतराने करा. उडीद पिकासाठी दोन रोपांतील अंतर १० सेमी ठेवावे. त्याच वेळी, ४ ते ६ सेंटीमीटर खोलीवर बियाणे पेरणे. प्रेणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे महत्वाचे आहे.

## गव्हावरचा 'कर्नाल बंट' रोग आहे सर्वात खतरनाक करतो मोठे नुकसान

**गव्हाच्या पिकामध्ये ओंब्या काळ्या पडताना दिसत असतील, तर शेतकऱ्यांनी याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. ही समस्या केवळ दिसण्यापुरती मर्यादित नसून थेट उत्पादनावर आणि उत्पन्नावर मोठा परिणाम करणारी ठरू शकते. गव्हाच्या ओंब्या काळ्या पडण्यामागे कर्नाल बंट नावाचा एक धोकादायक बुरशीजन्य रोग कारणीभूत असतो. वेळेवर लक्ष न दिल्यास हा रोग संपूर्ण पीक खराब करू शकतो.**

**कर्नाल बंट रोगाची लक्षणे :**

कर्नाल बंट रोगाची लक्षणे सुरुवातीला फारशी स्पष्ट दिसून येत नाहीत. बहुतांश वेळा हा रोग कापणीनंतर किंवा मळणीच्या वेळी लक्षात येतो. या रोगामुळे गव्हाच्या दाण्यांचा काही भाग



किंवा संपूर्ण दाणा काळा पडतो आणि आतून पावडरसारखा होतो. अशा दाण्यांना कुजलेल्या माशासारखा वास येतो, जो या रोगाची प्रमुख ओळख मानली जाते. प्रभावित ओंब्या पूर्णपणे भरलेल्या नसतात आणि त्यांची गुणवत्ता पूर्णपणे घसरते.हा रोग पसरण्यासाठी हवामान मोठी भूमिका बजावते. गव्हाच्या फुलोऱ्याच्या काळात जर तापमान ८ ते २३ अंश सेल्सिअस दरम्यान असेल आणि वातावरणात जास्त आर्द्रता, ढगाळ हवामान किंवा हलका पाऊस असेल, तर कर्नाल बंट रोगाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे बारकाईने निरीक्षण करणे अत्यंत गरजेचे असते.

**हा रोग येण्यामागील कारणे :**

बियाणे आणि माती हेही या रोगाच्या प्रसारामागील महत्त्वाचे घटक आहेत. जर पेरणीसाठी वापरलेले बियाणे आधीच संक्रमित असेल, तर रोग झपाट्याने पसरतो. तसेच जमिनीत असलेले बुरशीचे बीजाणू (टेलिओस्पोर्स) अनेक वर्षे सक्रिय राहू शकतात. त्यामुळे पेरणीपूर्वी बियाण्यांची योग्य तपासणी आणि प्रक्रिया करणे अत्यावश्यक ठरते.

**या रोगावर नियंत्रण :**

या रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धती अवलंबणे गरजेचे आहे. सर्वप्रथम प्रमाणित व रोगप्रतिकारक बियाण्यांचाच वापर करावा. बियाणे खरेदी करताना केवळ विश्वासार्ह विक्रेत्यांकडूनच खरेदी करावी आणि निकृष्ट किंवा बनावट बियाणे टाळावीत. पेरणीपूर्वी योग्य बुरशीनाशकाने बीजप्रक्रिया केल्यास रोगाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.पीक फेरपालट म्हणजेच पीक रोटेशन हाही एक महत्त्वाचा उपाय आहे. सलग अनेक वर्षे गहूच लागवड केल्यास या रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. त्यामुळे किमान पाच वर्षे गहू व्यतिरिक्त इतर पिकांची लागवड करावी. यामुळे जमिनीत असलेले रोगकारक घटक कमी होण्यास मदत होते.सिंचन व्यवस्थापनाकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. गहू फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना शेतात जास्त ओलावा राहणार नाही याची काळजी घ्यावी. पाणी साचणार नाही यासाठी योग्य निचऱ्याची व्यवस्था करावी.कर्नाल बंट रोगामुळे गव्हाच्या उत्पादनात थेट ४० ते ५० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. यामुळे बाजारात दर कमी मिळतात आणि निर्यातीसाठी पीक अयोग्य ठरते. त्यामुळे वेळेवर योग्य उपाययोजना करून या रोगापासून गव्हाचे पीक वाचवणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.




### जागतिक दिवस

१९१८ एस्टोनियाने (राष्ट्रध्वज चित्रित) रशिया पासून स्वातंत्र्य जाहीर केले.
जागतिक मुद्रण दिन
केन्द्रीय उत्पादनशुल्क दिवस

### महत्वाच्या घटना

१६७०: राजगड येथे छत्रपती राजाराम यांचा जन्म
१८२२: जगातील पहिल्या स्वामीनारायण मंदिराचे अहमदाबाद येथे उद्घाटन झाले.
१९२०: नाझी पार्टीची स्थापना झाली.
१९२४: आजच्या दिवशी महात्मा गांधी यांची जेल मधून सुटका झाली.
१९१८: इस्टोनियाला (रशियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९३८: ड्यु पाँ कंपनीने नायलॉनचा दात घासण्याचा ब्रश विकण्यास सुरुवात केली.
१९४२: 'व्हॉइस ऑफ अमेरिका' या रेडिओ केन्द्राचे प्रसारण सुरू झाले.
१९४६: जुआन पेरोन हे अर्जेंटीना चे राष्ट्रपती म्हणून निवडल्या गेले.
१९५२: कर्मचारी राज्य विमा योजनेची सुरूवात झाली.
१९६१: मद्रास राज्याचे नाव बदलून तामिळनाडू असे करण्याचा सरकारने निर्णय घेतला.
१९८७: इयान शेल्डन या शास्त्रज्ञाने मॅगेलेनिक नक्षत्रपुंजात '१९८७ ए' या तेजस्वी तेजोमेघाचा शोध लावला. तेव्हा तो पृथ्वीपासून १,६८,००० प्रकाशवर्षे दूर होता.
२००८: फिडेल कॅस्ट्रो ३२ वर्षांनी क्युबा च्या अध्यक्ष पदावरून निवृत्त झाले.
२०१०: एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात द्विशतक करणारा सचिन तेंडुलकर हा पहिला खेळाडू बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८३: बाबर यांचा जन्म
१६७०: राजाराम मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती, शिवाजी महाराजांचे चिरंजीव (मृत्यू: २ मार्च १७००)
१९२४: तलत महमूद पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा (मृत्यू: ९ मे १९९८ मुंबई, महाराष्ट्र)
१९३९: जॉय मुकर्जी चित्रपट कलाकार आणि दिग्दर्शक (मृत्यू: ९ मार्च २०१२)
१९४८: जे. जयललिता राजकारणी आणि दक्षिणेतील अभिनेत्री
१९५५: स्टीव्ह जॉब्ज ॲपल कॉम्प्युटर्सचा सहसंस्थापक (मृत्यू: ५ आक्टोबर २०११)
१९५९: राज्य सभेचे सदस्य अभिषेक सिंघवी यांचा जन्म.
१९६३: भारतीय चित्रपट दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांचा जन्म.
१९६६: राज्य सभेचे सदस्य उदयनराजे भोसले यांचा जन्म.
१९७२: भारतीय चित्रपट अभिनेत्री तसेच दिग्दर्शक पूजा भट्ट यांचा जन्म.
१९९४: सैराट मराठी चित्रपट अभिनेता आकाश ठोसर चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६७४: कोल्हापूरजवळील नेसरीच्या खिंडीत बहलोलखानाच्या फौजेवर हल्ला करताना सेनापती प्रतापराव गुजर व त्यांचे ६ सहकारी मारले गेले. या प्रेरणादायी घटनेवरच कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी 'वेडात मराठे वीर दौडले सात' हे काव्य लिहिले आहे.
१७६५: लिटिल ब्रिटन, पेनसिल्व्हानिया, यू. एस. ए.)
१८१०: हेन्री कॅव्हेंडिश हायड्रोजन आणि आरगोन वायूंचा शोध लावणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १० आक्टोबर १७३१)
१८१५: रॉबर्ट फुल्टन अमेरिकन अभियंते व संशोधक, वाफेच्या शक्तीवर चालणारी जहाजे त्यांनी शोधल्यामूळे शिडाच्या जहाजांचे युग संपुष्टात आले. पाणतीराचा शोधही त्यांनीच लावला. (जन्म: १४ नोव्हेंबर)
१८१५: वाफ़ेवर चालणारे जहाज व पाणबुडी संशोधक 'रॉबर्ट फुलटोन' यांचे निधन
१९३६: लक्ष्मीबाई टिळक 'स्मृतिचित्रे' हे त्यांचे आत्मचरित्र मराठी साहित्यात अजरामर झाले आहे. (जन्म: ? ? १८६८)
१९३६: क्षयरोग निवारण दिन लक्ष्मीबाई टिळक स्मृतिदिन
१९७५: निकोलाय बुल्गानिन सोविएत युनियनचे अध्यक्ष (जन्म: ३० मार्च १८९५)
१९८६: रुक्मिणीदेवी अरुंडेल भरतनाट्यम नर्तिका (जन्म: २९ फेब्रुवारी १९०४)
१९९८: मराठी चित्रपट अभिनेत्री ललिता पवार यांचे निधन
२०११: अनंत पै ऊर्फ 'अंकल पै' 'अमर चित्र कथा' चे जनक (जन्म: १७ सप्टेंबर १९२९)
२०१८: प्रसिद्ध हिंदी अभिनेत्री श्रीदेवी यांचे निधन.

# तलाठी कार्यालय आणि पोलीस इमारतीसाठी अजूनही खरवंडीकरांची प्रतिक्षा वेट अँड वॉच !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भटक्या पंढरीतील ऊस तोडणी कामगारांच्या पट्ट्यातील खरवंडी कासार हे दळणवळण व्यापारी क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे उपनगर असून, येथे मात्र नेहमी दरोडे चोऱ्या रस्ते लुटमार आणि अनेक गंभीर गुन्हे घडत असून सुद्धा गेल्या दहा वर्षांपासून खरवंडी कासार हे उपनगर नवीन पोलीस इमारत आणि नवीन पोलीस स्टेशन मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. तर दुसरीकडे महसूल विभागाच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि गोरगरीब लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजामुळे तब्बल २५ किलोमीटर वरून भालगाव खरवंडी ते पाथर्डी असा प्रवास येथील ऊसतोड मजूर कामगारांना करावा लागत आहे.

नागरिकांना महसुली प्रशासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या सेवा ऑनलाईन पद्धतीने मिळाव्यात जमिनीची नोंद विहिरीची नोंद सातबारा आठ अ उतारे अशा विविध प्रकारच्या सेवा आणि इतर तलाठ्यांच्या मार्फत होणारी कामे ही दहा ते पंधरा दिवस रखडले जातात आणि तलाठी किंवा मंडळ अधिकारी हे दहा ते पंधरा दिवसात कामगार तलाठी कार्यालयात उपस्थित नसतात. यामुळे लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजासाठी त्यांना सरकारी काम आणि सहा महिने




थांब अशा पद्धतीने थांबावे लागते. यामुळे खरवंडी कासार हे मध्यवर्ती उपनगर असल्याने जवळपास दहा ते पंधरा गावचा महसुली कारभार कामगार तलाठी कार्यालयातून चालतो परंतु येथे मात्र सरकारी प्रशासकीय इमारत नसल्याने महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांसह लोकांची गैरसोय होत आहे.

## आ.मोनिका राजळे तुम्ही खरवंडीकरांच्या पालक नाहीत का ?

**आ.मोनिका राजळे यांना सर्वसामान्यांची माई मोनिकाताई असे संबोधन आपले कार्यकर्ते यांनी दिले आहे यामुळे या पाथर्डी शेवगाव मतदार संघाच्या आपण पालक असाल तर मग खरवंडीकरांच्या आपण पालक नाहीत का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. खरवंडी कासार आणि परिसरातील या गंभीर समस्येकडे आपण लक्ष घालून खरवंडी कासार येथे नवीन पोलीस स्टेशन निर्मिती नवीन पोलीस प्रशासकीय इमारत आणि कामगार तलाठी कार्यालय मंजूर करत नवीन प्रशासकीय इमारत तातडीने निर्माण कराव्यात व येथील नागरिकांची गैरसोय दूर करावी.**

**–उज्वला गहिनीनाथ शिरसाट (मा.जिल्हा परिषद सदस्य)**

## तलाठी कार्यालय व पोलीस चौकी बनली शोभेची वास्तू?

खरवंडी कासार येथील कामगार तलाठी कार्यालय व पोलीस चौकी हे ग्रामपंचायत खरवंडी कासार गायरान जागेत असून, येथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तिथे मुतारी झाली असून, अवैध देशी दारूच्या बाटल्या पोलीस चौकीत आणि तलाठी कार्यालयात पडून असतात. सरकारी कार्यालय आहे की एखादा कुंटणखाना अशी परिस्थिती या दोन्ही कार्यालयाची असल्याने येथे कोणाचेही नियंत्रण नाही. पंधरा दिवसातून एकदा येथे पोलीस चौकी किंवा तलाठी कार्यालयाचे कामकाज चालते. पोलीस अधिकारी व कामगार, तलाठी, मंडळ अधिकारी या कर्मचाऱ्यांना येथे थांबावेशे वाटत नाही. यामुळे खरवंडी कासार हे मराठवाड्याच्या सरहद्दीवर असल्याने येथे नेहमी चोरी, रस्ते लूटमार, अशा गंभीर स्वरूपाच्या घटना घडत असतात. यामुळे खरवंडी कासार पोलीस दुरक्षेत्र २४ तास सुरू असावे.

छाया – प्रा.दादासाहेब खेडकर.

# मालकावर गुन्हा दाखल करून पाच बालकामगारांची सुटका

जालना प्रतिनिधी

जिल्ह्यात बालकामगार प्रथेला चाप लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष शोध मोहिमेत पाच बालकामगारांची सुटका करण्यात आली. तसेच एका आस्थापना मालकावर पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. जिल्हा बालकामगार अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

१४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. कायद्यानुसार, दोषी मालकास किमान ३ महिने कारावास आणि २० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. जिल्ह्यात कुठेही बालकामगार आढळल्यास नागरिकांनी तत्काळ १०९८ या चाईल्डलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

बालकामगार शोध मोहिमेसाठी जिल्हा बालकामगार अधिकारी, चाइल्ड हेल्पलाईन, पोलीस प्रशासन, आरोग्य आणि शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींचे एक विशेष संयुक्त पथक गठित करण्यात आले होते. या पथकाने शहरातील विविध दुकाने, हॉटेल्स आणि छोट्या उद्योगांवर अचानक छापे टाकले. या कारवाईत एकूण पाच अल्पवयीन मुले काम करताना आढळली. यात एका १४ वर्षांखालील बालकाचा आणि १६ वर्षांवरील चार किशोरवयीन मुलांचा समावेश आहे. सुटका करण्यात आलेल्या सर्व मुलांना बालकल्याण समिती समोर हजर करण्यात आले आहे. समितीच्या आदेशानुसार या मुलांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया राबविली जाणार आहे. दरम्यान, बाल आणि किशोर कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ चे उल्लंघन केल्याप्रकरणी एका मालकावर कठोर कारवाई करत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांनी अनुभवले महानगरपालिकेचे प्रशासन; आयुक्त आशिमा मित्तल यांनी साधला संवाद

जालना प्रतिनिधी

जालना येथील संस्कार प्रबोधिनी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आज जालना शहर महानगरपालिकेला क्षेत्र भेट दिली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रशासकीय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी महानगरपालिकेचे विविध विभाग, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची कार्यपद्धती आणि नागरी समस्यांचे निराकरण कसे केले जाते, याची सखोल माहिती घेतली. आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या कुतूहलाचे कौतुक करत त्यांना प्रशासकीय व्यवस्थेची ओळख करून दिली. शहराला पाणीपुरवठा नेमका कुठून आणि कसा होतो, याबाबत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मनपाचे पाणीपुरवठा अभियंता बगळे यांनी उत्तरे दिली. जायकवाडी व घाणेवाडी यांसारख्या जलस्त्रोतांपासून ते शुद्धीकरण प्रक्रिया आणि जलवाहिन्यांद्वारे घराघरांत पोहोचणाऱ्या पाण्यापर्यंतच्या प्रवासाची तांत्रिक माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत दिली. विद्यार्थ्यांनी मनपाला प्राप्त होणारा कर आणि त्याचा विनियोग कसा होतो, याबद्दलही माहिती जाणून घेतली. यावर बोलताना आयुक्त आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले की, नागरिकांकडून जमा होणारा कर हा शहराच्या मूलभूत सोयी–सुविधांसाठी वापरला जातो. यामध्ये प्रामुख्याने रस्ते व नाली बांधकाम, अखंडित पाणीपुरवठा, सार्वजनिक विद्युत व्यवस्था (स्ट्रीट लाईट्स) आणि इतर नागरी सोयींचा समावेश असतो. शालेय जीवनातच स्थानिक प्रशासनाची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाच्या कर्तव्याची जाणीव निर्माण होण्यास मदत होते. संस्कार प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी या माहितीपूर्ण भेटीबद्दल मनपा प्रशासनाचे आभार मानले.

# बस प्रवासासाठी स्मार्ट कार्ड नोंदणी सुरू

जालना । प्रतिनिधी

जालना आगारात अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व विद्यार्थी प्रवाशांसाठी एस.टी. बस प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. शासनाच्या निर्देशानुसार विविध सवलत धारक प्रवाशांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यासाठी जालना बस स्थानकातील आरक्षण व पासेस (वाहतूक विभाग) काउंटरवर नोंदणी प्रक्रिया सर्व करण्यात आली.

राज्य परिवहन जालना आगारात दि.२३ फेब्रुवारीपासून एनसीएमसी कार्ड सुविधा प्रवाशासाठी सुरू करण्यात आलेली आहे. सदर कक्षाचे उद्घाटन विभागीय वाहतूक अधिकारी सुरेश (पाटील) टकले यांच्या हस्ते करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी ज्येष्ठ नागरिक ,महिला, अपंग,



विद्यार्थी, इतर प्रवासी यांच्यासाठी एनसीएमसी कार्डची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या उद्घाटन प्रसंगी आगार व्यवस्थापक अजिंक्य जैवळ, पत्रकार शिवाजी मस्के, अनिल राठोड वाहतूक अधीक्षक, स न खान व श्री शेख वाहतूक निरीक्षक इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. जालना आगार कार्यक्षेत्रातील सर्व रा.प.म. प्रवाशांनी सदर स्मार्ट कार्डची नोंदणी करून घ्यावी, जेणेकरून भविष्यात एस.टी. बस प्रवास अधिक सुलभ व सोयीस्कर होईल, असे आवाहन जालना आगारातर्फे करण्यात आले.

# शिंदे गट शिवसेनेला मोठे खिंडार कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळत असून, शिवसेना (शिंदे गट) पक्षाला मोठे खिंडार पडले आहे. शिवसेनेचे अंबड तालुकाध्यक्ष श्री. शैलेश कुढेकर यांनी आपल्या समर्थकांसह भाजपचे नेते सतीश घाटगे साहेब यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे अंबड तालुक्यात भाजपची ताकद अधिक भक्कम झाली असून विरोधकांचे धाबे दणाणले आहेत.

या पक्षप्रवेश सोहळ्यात भांबेरी येथील युवा कार्यकर्ते ॲड. राहुल पाटील कणके व नितीन माने यांनी देखील सतीश घाटगे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला.या पक्षप्रवेशामुळे आगामी निवडणुकांच्या



पार्श्वभूमीवर अंबडमधील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. सतीश घाटगे यांनी नवीन सदस्यांचे पक्षात स्वागत करून सन्मानित केले. यावेळी बोलताना घाटगे साहेब म्हणाले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखालील विकासकामे आणि पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या नवीन सहकाऱ्यांची मोठी मदत होईल. सर्वांच्या साथीने आपण तालुक्याचा कायापालट करू.'' त्यांनी सर्व नवनियुक्त कार्यकर्त्यांना त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अंबड तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक श्री. उद्धव नाना लांडे, भारडीचे युवा सरपंच नवनाथ डोईफोडे, उपसरपंच सय्यद नासेर भाई, सामाजिक कार्यकर्ते तैमूर भाई, तसेच भाजप ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष माधव टेहळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जवखेड खा.येथील कान्होबा देवस्थानचा हिंदू–मुस्लिम धार्मिक वाद अखेर संपुष्टात

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील जवखेड येथील श्री कानोबा देवस्थान (दर्गाह) संदर्भात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आणि सामाजिक शांततेसाठी आव्हान ठरलेला वाद अखेर प्रशासनाच्या यशस्वी मध्यस्थीने आणि दोन्ही समाजाच्या सामंजस्याने कायमचा संपुष्टात आला आहे.

उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू आणि पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या उपस्थितीत झालेल्या शांतता बैठकीत हा ऐतिहासिक तोडगा काढण्यात आला या यशस्वी बैठकीमुळे गावातील जातीय तणाव निवळण्यास मोठी मदत झाली असून प्रशासनाने दाखवलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल दोन्ही समाजाच्या कार्यकर्त्यांनी व भाविकांनी प्रशासनाचे विशेष आभार मानले आहेत या महत्त्वपूर्ण बैठकीत हिंदू व मुस्लिम समाजाच्या संमतीने काही कडक नियमावली निश्चित करण्यात आली आहे त्यानुसार कान्होबा देवस्थानची स्वच्छता दोन्ही समाजाने एकत्रित मिळून करायची आहे मात्र देवस्थानच्या मूळ इमारतीत कोणीही कोणत्याही प्रकारची छेडछाड किंवा बदल करू नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच कानिफनाथ उर्फ कान्होबा देवाच्या मूळ वास्तूच्या स्वरूपाला बाधा येऊ नये म्हणून इमारतीला आतून किंवा बाहेरून कोणीही रंगकाम करू नये किंवा चुना लावू नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. धार्मिक विधींच्या बाबतीत प्रशासनाने सुवर्णमध्य साधला असून ज्या काही पूजा किंवा धार्मिक विधी करायच्या असतील त्या दोन्ही समाजाने आपापल्या परंपरेनुसार स्वतंत्रपणे फक्त समाधीलाच पूजन करून पार पाडाव्यात असे ठरले आहे. या निर्णयानुसार आता दोन्ही समाजाच्या मिरवणुका आपापल्या स्वतंत्र ध्वजांसह (झेंडे) निघणार असून, शांततेत धार्मिक विधी पूर्ण केले जातील. प्रशासनाने दिलेल्या आदेशानुसार सर्व धार्मिक रितीरिवाज आणि मिरवणुका सामाजिक सलोखा राखून पार पाडण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. जवखेडे खालसा या गावात वर्षानुवर्षे हिंदू – मुस्लिम वाद संपवून हिंदू मुस्लिम ऐक्याची ध्वजा ग्रामस्थ व प्रशासनाच्या मदतीने पुनर्वत होईल अशी अपेक्षा आहे.


## जाहिरनामा

मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३००/२०२६

विधीज्ञ बी.एन. तावरे

महानंदा काटे व इतर वि. निरंक

मागणीः– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १) महानंदा भ्र. पांडुरंग काटे, वय– ४८ वर्षे, धंदा–घरकाम, रा. आहेरवडगांव, ता.जि.बीड २) अक्षय पि. पांडुरंग काटे, वय ३० वर्षे, धंदा–शेती, रा. आहेरवडगांव, ता. जि.बीड

३) अश्वीनी भ्र. राकेश काळे, वय– ३२ वर्षे, धंदा–घरकाम, रा. मेंगडेवाडी, ता. कात्रज, जि.पुणे ४) अनुजा भ्र. सुनिल सपकाळ, वय–२७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. चंपावती नगर, बीड, ता.जि.बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे पांडुरंग छगन काटे हे दिनांक ०३/०४/२००९ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ व ४ हया अर्जदाराच्या विवाहित मुली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे पांडुरंग छगन काटे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत पांडुरंग छगन काटे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०४/०४/२०२६ आहे.

आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरित/–** **आदेशावरून स्वाक्षरित/–**

**कनिष्ठ लिपीक** **अधीक्षक**

**३ रे सह दिवाणी व.स्तर,बीड** **दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय, अंबड**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२५/सेतु/कावि–४२ दिनांक–२०/०२/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती अबास अकबर सय्यद रा.नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

अर्शद उबेर शेख नातू ०७/०१/२०१८

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक–/ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय, अंबड**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५८२ दिनांक–२२/१२/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती नजराणा अब्बास सय्यद रा.नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

नजराणा अब्बास सय्यद स्वत: ०५/१०/१९९९

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक–/ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय, अंबड**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२५/सेतु/कावि–९८० दिनांक–१३/११/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती शगीर दस्तगीर सय्यद रा.भार्डी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

शगीर दस्तगीर सय्यद स्वत: ०८/०९/१९९६

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक–/ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय, अंबड**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१३९० दिनांक–१३/११/२०२५

अर्जदार श्रीमान/श्रीमती सलीमाबी मोहम्मद बागवान रा. हरतखेडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र. नाव अर्जदाराशी नाते जन्म दिनांक

शे. अन्वर शे. मोहम्मद हुसेन मुलगा २०/०५/१९६३

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक–/ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# दिवसा ढवळ्या मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न नागरिकांच्या सतर्कतेमुळे फसला

## मोठ्या बहिणीच्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल; मोठ्या बहीणीच्या धाडसामुळे अनर्थ टळला

माजलगाव । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील तुळजा भवानी कॉलनीतील दोन बहीणी माजलगावमध्ये खाजगी रुग्णालयाजवळ थांबल्या असताना त्यांच्यावर पाळत ठेवून अपहरण करण्याचा प्रयत्न माजलगाव येथील संजिवनी हॉस्पिटल जवळ असताना मोठ्या बहिणीने मोठी आरडाओरड केल्याने आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी धाव घेतली आणि हा अपहरणाचा अनर्थ टळला.शहर पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांना ताब्यात घेतले असुन याप्रकरणी मोठ्या बहिणीच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.मात्र तरूण मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलीसांनीच सतर्क राहण्याची मागणी जनतेतून होत आहे.

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि २३ फेब्रुवारी सोमवार रोजी अंबाजोगाई शहरातील भाग्यश्री ज्ञानोबा हाजारे व सलोनी ज्ञानोबा हाजारे या दोन सख्ख्या बहिणी शहरातील बायपास रोडवरील संजीवनी हॉस्पिटल येथे दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास थांबल्या असता आरोपी दिनेश



पुरूषोत्तम देवकते ( रा.येलडा,ता.आंबाजोगाई), रविंद्र बिभीषण निळे ( रा.चोथेवाडी,ता.आंबाजोगाई),मजहर सिकंदर सय्यद (रा.चोथेवाडी, ता.आंबाजोगाई) यांनी आप-आपसात संगनमत करून त्यांच्या ताब्यातील पांढऱ्या रंगाची गाडी क्रं.एम.एच.१२-डब्ल्यु एक्स-४१६७ या गाडीतुन दोन मुलींचे अपहरण करून नेण्याचा प्रयत्न चालू असताना यातील मोठ्या बहिणीने जोर जोऱ्याने ओरडायला सुरूवात केली. त्यामुळे अपहरणकर्ते पळू लागले होते.मात्र परिसरात असलेल्या सतर्क नागरीकांनी तात्काळ या तिघांना धरले. पोलीसांनीही या प्रकरणाचे गांभीर्य पाहून तातडीने घटनास्थळी धाव घेऊन त्या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील वाहने जप्त केली आहेत.सदरील हा गंभीर प्रकार दिवसा ढवळ्या भर दुपारी झाल्याने विद्यार्थीनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.त्यामुळे पोलीस प्रशासनाने सतर्क राहण्याचे आवश्यकता आहे. एवढेच नव्हे तर शाळा,कॉलेज व इतर ठिकाणी सुरक्षा वाढविणे गरजेचे आहे अशी मागणी होत आहे. या प्रकरणी मोठ्या बहिणीच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपी दिनेश देवकते, रविंद्र निळे व मजहर सय्यद या तिघांविरुद्ध गु.रं.नं.५७/२०२६ कलम १३७(२),३(५) बि.एन.एस.अन्वयेगुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक खेत्रे आर.एम.(१७९६) हे करत आहेत. सदरील पकडण्यात आलेले तीन आरोपी नेमके क्शासाठी अपहरण करून कोठे नेणार होते,कोणाच्या सांगण्यावरून केले हे आता पुढील तपासात निष्पन्न होईल.

# अवकाळी पाऊस, गारपिटीने परळी मतदारसंघात पिकांचे नुकसान

## आ. धनंजय मुंडेंच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

कालपासून वातावरणात अचानक झालेल्या बदलानंतर परळी मतदारसंघातील अंबाजोगाई तालुक्यासह परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अवकाळी पाऊस, वादळासह गारपीट झाल्याने उभ्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना परळी मतदारसंघाचे आमदार माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हाधिकारी



विवेक जॉन्सन यांना दूरध्वनी द्वारे केले आहेत.

रविवारी रात्रीपासून परळी मतदारसंघातील अंबाजोगाई व परळी तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व बऱ्याच गावांमध्ये गारपीट झाली असून, त्यामुळे गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला, फळपिके यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

या पूर्वी देखील खरीप हंगामात विशेष करून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात परळी मतदारसंघात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून पंचनामे व अन्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्याच पार्श्वभूमीवर गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची देखील भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

# महादेव कोळी समाजाच्या जात प्रमाणपत्रांचा प्रश्न ऐरणीवर

माजलगाव । प्रतिनिधी

महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मागील अनेक दिवसांपासून प्रशासकीय पातळीवर लढा द्यावा लागत आहे. काही दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते मुंजाराम गाडेकर यांनी पुकारलेल्या तीव्र आंदोलनानंतर प्रशासनाने दखल घेत प्रक्रिया गतिमान केली होती. त्यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी आंदोलकांशी चर्चा करून समाजाच्या प्रलंबित फाईल्स तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनानंतर प्रशासनाने सुमारे २५० ते ३०० प्रमाणपत्रे वितरित केली, ज्यामुळे समाजात समाधानाचे वातावरण होते.

सुरुवातीला वेगवान वाटणारी ही प्रक्रिया आता पुन्हा थंडावली आहे. सद्यस्थितीत उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे १०० ते १५० फाईल्स धूळ खात पडून आहेत. कागदपत्रांची छाननी पूर्ण होऊनही स्वाक्षरी अभावी किंवा तांत्रिक कारणास्तव प्रमाणपत्रे प्रलंबित असल्याचे समाज बांधवांचे म्हणणे आहे. शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया आणि नोकरभरतीचे वारे वाहत असताना प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

उपोषणावेळी गौरव इंगोले यांनी दिलेल्या शब्दामुळे महादेव कोळी समाजाने आंदोलन मागे घेतले होते. मात्र, आता प्रशासनाचा ढिसाळ कारभार पाहता, समाजाची पुन्हा उपेक्षा होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. प्रशासनाने येत्या ८ दिवसांत प्रलंबित असलेल्या सर्व जात प्रमाणपत्रांचे वाटप न केल्यास, मुंजाराम गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली महादेव कोळी समाज पुन्हा एकदा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

कायदेशीर पेच आणि मागणी

महाराष्ट्र शासनाच्या पान ३ वर

# बीड शहराच्या ऐतिहासिक ओळखीचा आधारस्तंभ शहराचा चेहरा बदलू शकतो

बीड । प्रतिनिधी

शहराची ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळख सांगणारी दिपमाळ ही शहराच्या वैभवशाली परंपरेची साक्ष देणारी महत्त्वपूर्ण वास्तू आहे. सतराव्या शतकापासून आजतागायत आपले अस्तित्व टिकवून असलेल्या या दिपमाळेने अनेक ऐतिहासिक कालखंडांचे साक्षीदार म्हणून उभे राहून बीडच्या इतिहासाला उजाळा दिला आहे. काळाच्या ओघात नैसर्गिक झीज, दुर्लक्ष आणि



बदलत्या परिस्थितीमुळे अशा वास्तूच्या संवर्धनाची आवश्यकता निर्माण झाली होती.

सध्या दिपमाळेच्या जतन व दुरुस्तीचे काम सुरू असून पारंपरिक रचना जपण्यावर भर देण्यात येत आहे. बांबूच्या मचानांद्वारे चालू असलेले हे काम ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या तंत्रांचा वापर करून केले जात असल्याचे दिसून येते. या माध्यमातून दिपमाळेची मूळ रचना अबाधित ठेवत तिचे आयुष्य वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

ही दिपमाळ केवळ धार्मिक अथवा स्थापत्यदृष्ट्या महत्त्वाची नसून बीड शहराची ओळख म्हणूनही पान ३ वर

# आष्टीच्या कृषी प्रदर्शनाला मंत्री, आमदार यांनी फिरवली पाठ

कडा । प्रतिनिधी

तालुक्यात येथे गेल्या दोन वर्षापासून राज्यस्तरी रामानाथन कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले पण या कृषी प्रदर्शनच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी राज्यातील विविध मंत्री, आमदार यांना आयोजकांनी भेट घेऊन निमंत्रित करण्यात आले होते पण यावेळी या उद्घाटनप्रसंगी विविध मंत्री व जिल्ह्यातील आमदार यांनी आपली उपस्थिती दाखवली नसल्याने या कार्यक्रमाला पाठ फिरवली असल्याचे दिसून आले होते तीस-या दिवस असल्याने शेतकरी येत नसल्याने आयोजकांनी आता संस्थेच्या

**शेतकरी यांची कमी उपस्थिती पण संस्थेच्या कर्मचाऱ्यांची मोठी संख्या, संस्थेच्या विद्यार्थ्यांना आणून गर्दी दाखवण्याचा आटापिटा**

> ज्या माणसाने शेतकऱ्यांची कामधेनू असलेला कडा सहकारी साखर कारखाना चाटून पुसुन हानला,तसेच कापूस उत्पादक शेतकर्यांचे भवीतव्य असलेली शेतकरी सहकारी सूतगिरणीची भ्रूण हत्या केली.तो मनुष्य स्वतःला शेतकऱ्यांचा नेता कसा म्हणवून घेऊ शकतो? सध्या कृषि प्रदर्शन भरविले आहे ते सगळ फक्त स्वतःचे कृषी महाविद्यालय सुरू ठेवण्यासाठी केलेला स्टंट आहे . मुळात माजी आ भिमराव धोंडे यांना शेतकऱ्यांशी काहीही देणं-घेणं नाही.
>
> - प्रताप थोरवे शेतकरी नेते

विद्यार्थ्यांना आणून गर्दी दाखवण्याचा आटापिटा सुरू केल्याचे दिसून येत आहे.

आष्टी तालुक्यात गेल्या दोन वर्षापासून राज्यस्तरी कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात येते पण या कृषी प्रदर्शनाची तयारी जोरदार करण्यात आली यामध्ये १०० स्टॉल उभारण्यात आली आहेत त्यांच्या कडून लहान स्टॉल करून दहा हजार तसेच मोठे कमी जास्त स्टॉलला काहींना पंधरा काहींना विस हजार चार्ज घेतलेला आहे आणि शासना कडून एकमेव असलेले तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील स्टॉलला चार्ज घेतला नाही.सर्व स्टॉल यांना जी पाहिजे सुविधा पाणी व फॅन कुलर वैगरे दिलेली दिसत नाही, पण या कृषी प्रदर्शनाला राज्यातील उपमुख्यमंत्री सुनित्रा पवार,कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन मंत्री पान ३ वर

# छत्र बोरगाव येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात



माजलगांव । प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील छत्र बोरगाव येथे दि. २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत गावातील तरुणांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मानवतेचा जिवंत संदेश दिला.

या रक्तदान शिबिरात एकूण २५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून अनेक युवकांनी पुढाकार घेतला. रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना जीव गमवावा लागतो, ही बाब लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या स्वच्छता, सेवा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. समाजातील अंधश्रद्धा दूर करून सेवा आणि परोपकाराची शिकवण देणाऱ्या गाडगेबाबांच्या जयंतीदिनी रक्तदानासारखा उपक्रम राबविणे ही त्यांना खरी आदरांजली असल्याचे आयोजकांनी सांगितले.

शिबिरासाठी वैद्यकीय पथकाने रक्तसंकलनाची जबाबदारी पार पाडली. रक्तदात्यांची आवश्यक तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्तसंकलन करण्यात आले. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या विचाराची विद्यार्थ्यांना गरज -प्राचार्य विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रसंत संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने या जयंतीचे आयोजन करण्यात आले सर्वप्रथम गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक सोमनाथ घाडगे प्राध्यापक डॉ कल्पना घारगे मॅडम प्राध्यापक ज्योति रकटे नक चे समन्वयक प्राध्यापक विनोद कीदक उपस्थित होते या कार्यक्रमाची प्रस्ताविक सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांचे स्वच्छतेचे व सामाजिक समतेची व स्वच्छतेचे विचारा अंगीकार करून हा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना संत गाडगे महाराज यांचे विचाराची गरज असल्याचे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे यांनी आपले मनोगत व्यक्त केले या डॉ सुनील जाधव उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक डॉ नारायण फुने यांनी मांडले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक लोखंडे यांनी सहकार्य केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजसेवा हीच ईश्वर सेवा - केशव बादाडे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा गावी राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती दि.२३ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी दहा वाजता मोठ्या उत्साहात शाळेच्या परिसरातील सर्व स्वच्छता करून साजरी करण्यात आली.




कार्यक्रमाची सुरुवात सर्व विद्यार्थी शिक्षक यांनी शालेय परिसर स्वच्छता करून प्रतिमा पूजनाने केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक बादल डेंगळ प्रमुख पाहुणे एन.आर. राठोड,विठ्ठल वाघ, संजय राठोड, माधव गड्डापोड, केशव बादाडे हे होते. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले विद्यार्थिनी कु.आरती नाईकनवरे हिने गाडगे महाराजांची वेशभूषा व विचारांची उकल केली. सहशिक्षक केशव बादाडे म्हणाले समाजसेवा हीच ईश्वर सेवा आहे त्यांनी संत गाडगे महाराजांची दहा संदेश विद्यार्थ्यांना सांगितले. माधव गड्डापोड उद्गारले विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने शाळेत स्वच्छता करावी, अध्यक्षीय समारोपात बादल डेंगळ म्हणाले अंधश्रद्धा पाळू नका देव देवळात नाहीतर माणसात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश झाटे यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार बबन कपाटे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांच्या सुविधासाठी केंद्र स्तरावर प्रयत्न करणार -खा.श्रीरंग बारणे

## पत्रकारांनी आता एकसंघ राहणे गरजेचे- एसएम देशमुख; कर्जत येथे राज्यस्तरीय पत्रकार संघ पुरस्कार सोहळा संपन्न

रायगड । प्रतिनिधी

पत्रकारांच्या विविध सेवा,, प्रवास योजना यासाठी दिल्लीच्या केंद्र स्तरावर आपण प्रयत्न करत असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी कर्जत येथील पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळ्या निमित्त वक्तव्य केले. पत्रकारांसाठी काळ कठीण आहे अशा काळात आपली संघटना एक संघ आहे याचा आनंद होतो मात्र यापुढील आव्हाने स्वीकारण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात केले

कर्जत जिल्हा रायगड या ठिकाणी रायगड व कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आयोजित राज्यातील जिल्हा व तालुका पत्रकार संघाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बोलताना खासदार श्रीरंग बारणे म्हणाले पत्रकारांनी आपली शोध पत्रकारिता अखंड चालू ठेवायला हवी मात्र यात आपण कमी पडलो त्याचा फायदा पुढारी नेते घ्यायला लागतात. पत्रकारांनी जे जे नवीन साधन येईल ते ते शिकायला हवे. पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे योगदान भरीव आहे त्यासाठी एस एम देशमुख यांचे प्रयत्न अफाट आहेत असे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हेमंत देसाई यांनी येथे



सांगितले. मराठी पत्रकार परिषदेचे यापुढील अधिवेशन उदगीर तालुका येथे एप्रिल महिन्यात होणार आहे. राज्यातील सर्व तालुक्यातून आपण सातशे पेक्षा जास्त पत्रकार ह्या गुण गौरव सोहळ्यासाठी उपस्थित राहिले तसेच आजच्या कर्जत आयोजक प्रेस क्लबचे उत्कृष्ठ नियोजना बद्दल आभार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी आपल्या भाषणातून मानले.अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आयोजित, रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन येथे पार पडला. यावेळी व्यासपीठावर खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे,, माजी आमदार सुरेश लाड, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, विश्वस्त किरण नाईक, मराठी परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई,,पत्रकार मंदार फणसे, परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे डिजिटल मीडिया चे अध्यक्ष अनिल वाघमारे,रायगड प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्यध्यक्ष संजय मोहिते,सरचिटणीस दर्वेश पालकर,कर्जतचे उपनगराध्यक्ष संजय पाटील, माजी अध्यक्ष भारत रंजणकर, कोकण विभाग अध्यक्ष अनिल भोळे, व नगरसेविका, उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांचे सजविलेल्या गाडीने वाजत गाजत आणून ढोल ताशापथकाने मिरवणूक व्यासपीठावर आणण्यात आली. पत्रकारांशी संवाद साधण्यासाठी वेळात वेळ काढून कर्जत येथे आलो. जेष्ठ पत्रकार यांना रेल्वे प्रवास सुविधा मिळावी यासाठी दिल्ली येथे प्रयत्न केले.. आपण पत्रकार फार मोठ्या कष्टाने, प्रसंगी जीव धोक्यात घालून पत्रकारिता करता याबद्दल पत्रकारांना धन्यवाद व्यक्त करतो. असे खासदार श्रीरंग बारणे यांनी येथे व्यक्त केले. पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांना तुषार दामगुडे आणि साथीदारांकडून मारहाण, दोन आरोपी ताब्यात

पुणे । प्रतिनिधी

एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. डिबेट शोसाठी ते संबंधित ठिकाणी गेले असताना तुषार दामगुडे आणि त्यांच्या सोबत असलेल्या इतर काही व्यक्तींनी त्यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज ट्विट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

याबाबत हनुमंत पवार म्हणाले, मी एका वृत्तवाहिनीच्या डेबिट शोला गेलो होतो तिथं मी भाजपच्या नेत्यांनी ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला होता त्याची आठवण करून दिली आणि याचाच राग या हिंदुत्वादी कार्यकर्त्यांना आला, असं हनुमंत पवार म्हणाले.

बाहेर आल्यानंतर मला धमकवण्यात आलं हर्षवर्धन सपकाळ याबद्दल बोललो तर तुला राग का येतो असं म्हणतं कमरेला बघ पिस्टल आहे, अशा पद्धतीने धमकवण्यात आलं, असं हनुमंत पवार म्हणाले.

मी अशा धमक्यांना भीक घालत नाही आणि अशा पिस्टलला देखील घाबरत नाही असं बोलल्यानंतर थेट त्यांनी माझ्यावर हल्ला केला. माझ्या छातीवर आणि तोंडावर जोरदार मार बसला आहे. विचारांची लढाई



विचारांनी लढली पाहिजे ही कुठली पद्धत आहे, असं हनुमंत पवार म्हणाले.

डिबेट झाल्यानंतर बाहेर आलो, त्यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासोबत बोलत होतो. तुषार दामगुडे यानं शिवीगाळ केली, असा आरोप देखील हनुमंत पवार यांनी केला. भाजपच्या विरोधात का बोलतो असं म्हणत कमरेच्या उजव्या बाजूला असलेलं पिस्तूल त्यानं दाखवलं, असंही हनुमंत पवार म्हणाले. तुषार दामगुडेच्या चार पाच सहकाऱ्यांनी मारहाण केली. पुण्यात जिवंत फिरायचं असेल तर भाजप विरोधात बोलायचं नाही, अशी धमकी देखील त्यांनी दिली, असं हनुमंत पवार म्हणाले. डीसीपी मिलिंद मोहिते यांनी

तुषार दामगुडे आणि हनुमंत पवार यांच्यात बाचाबाची झाली. तिथं असलेल्या चार ते पाच लोकांनी हनुमंत पवार यांना मारहाण केलेली आहे. या संदर्भात स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलेलं आहे, असं मिलिंद मोहिते म्हणाले. तुषार दामगुडेचे ते सगळे मित्र आहेत. दोन आरोपींना ताब्यात घेतल्याचं देखील मोहिते यांनी सांगितले.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्याकडून कारवाईची मागणी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी हनुमंत पवार यांच्यावरील हल्ल्याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस पक्षाचे तरुण प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर पुणे शहरातील मित्रमंडळ चौक येथे झालेली हल्ल्याची घटना अत्यंत गंभीर आणि संतापजनक आहे. भाजपशी संबंधित गुंड तुषार दामगुडे याने बंदुकीचा धाक दाखवत केलेला हा हल्ला लोकशाही मूल्यांवरचा थेट आघात आहे. वैचारिक मतभेद असू शकतात, परंतु दहशत आणि हिंसाचाराच्या माध्यमातून आवाज दाबण्याचा प्रयत्न कदापि सहन केला जाणार नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राजकीय संवाद या लोकशाहीच्या मूलभूत आधारस्तंभांवर घाला घालण्याचा हा प्रकार आहे. भाजपच्या या गुंडांवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले पाहिजे. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. गुंड प्रवृत्तीला पाठीशी न घालता आळा घालणे ही सरकारची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई केली पाहिजे, असं बाळासाहेब थोरात म्हणाले.

# अजित पवारांच्या घातपाताचा संशय, बारामतीमधील आणखी एक गाव बंद

बारामती । प्रतिनिधी

**दिवंगत नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत दिवसेंदिवस संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. अजित दादांचा अपघात की घातपात? याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून राज्य सरकारने या अपघाताची सखोल चौकशी करावी आणि सत्य बाहेर आणावे या मागणीसाठी बारामती तालुक्याती डोर्लेवाडी गाव आज बंद ठेवण्यात आले आहे.**

अशातच, अजित पवारांचा अपघाताचा तपास व्हावा या मागणीसाठी काल (रविवारी) बारामती तालुक्यातील लोणी भापकर हे गाव बंद ठेवण्यात आले होते. यावेळी लोणी भापकर ग्रामपंचायतीने पोलीस निरीक्षकांना पत्र लिहत सखोल चौकशीची मागणी केली होती. असे असताना अजित पवारांच्या घातपाताचा संशय




व्यक्त करत बारामतीमधील आणखी एका गावामध्ये बंद पुकारण्यात आला आहे. त्यामुळे अधिवेशनाच्या सुरुवातीलाच वेगळाच पॅटर्न बघायला मिळत आहे. अजितदादांच्या निधनाबाबत प्रसारमाध्यमांमध्ये सुरु असणाऱ्या बातम्या पाहता आम्हाला अजित पवार (-क्षळीं झुरी) यांचा घातपात झाल्याचा संशय आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताची सखोल चौकशी व्हावी, यासाठी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते निवेदन देणार आहोत. अजित पवारांचा विमाना अपघातात मृत्यू झाला त्या घटनेची सखोल चौकशी व्हावी, यासाठी बारामतीतील प्रशासकीय भावना बाहेर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जमले आहेत. प्रांत अधिकारी यांना दिवेदन देऊन सरकारने याची सखोल चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते करणार आहेत. कार्यकर्त्यांना अजित पवारांचा झालेला विमान अपघात हा घातपात वाटतो आहे. अशी शंका या कार्यकर्त्यांनी बोलताना व्यक्त केली आहे.

# बारामतीतील सूर्यनगरीत घरफोडी; सोन्या-दागिन्यांसह रोख रक्कम चोरी, दोघे अटकेत

बारामती: बारामती तालुक्यातील सूर्यनगरी परिसरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्याच्या दोन घटना ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आणि ११ जानेवारी रोजी दुपारी घडल्या होत्या. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

फिर्यादी श्रीकांत अशोकराव बिरादार (वय ३३, रा. सूर्यनगरी, बारामती) हे महावितरण शाखा सणसर येथे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी नेहमीप्रमाणे कामावर जाऊन सायंकाळी घरी परतल्यानंतर रात्री साडेनऊच्या सुमारास त्यांच्या पत्नी प्रज्ञा यांनी कपाटातील दागिने ठेवलेला कप्पा उघडा असल्याचे पाहिले. कपाटातील वस्तू अस्ताव्यस्त असून, सोने-चांदीचे दागिने तसेच अंदाजे १० हजार रुपये रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले.

पत्नी सायंकाळी पाच ते सहा या वेळेत मुलाला खेळवण्यासाठी खाली रस्त्यावर घेऊन गेल्या असताना घराचा दरवाजा पुढे लावलेला होता. याच वेळेत अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून चोरी केली



आली. यामध्ये मिनी गंठण (१७.५ ग्रॉम - ५० हजार), काप (८ ग्रॉम - २० हजार), इअरिंग (४ ग्रॉम - १० हजार), दोन अंगठ्या (६ ग्रॉम - १० रुपये), चांदीचे पैंजण, रोख १० रुपये असा एकूण अंदाजे किंमत २ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. सुरेंद्र वामनराव चव्हाण (वय ४८, रा. सुमन रेसिडेन्सी, फ्लॅट नं. ३, सूर्यनगरी, बारामती) यांच्याही घरी अशाच घटना होऊन ३५ हजार रुपये रोख रक्कम चोरी झाली होती. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज तपासून पोलिसांनी तांदूळवाडी (ता. बारामती) येथून ऋषिकेश विजय कोकाटे (वय २१, रा.अंबिकानगर, इंदापूर) याला ताब्यात घेतले. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. चौकशीत आरोपीने चोरीची कबुली देत चोरीतील सोन्याचे दागिने सोनार श्रेयस विठ्ठल कुलथे (वय २५, रा. व्यंकटेशनगर, इंदापूर) याच्याकडे दिल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी सोनार कोलते यालाही अटक केली आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अंमलदार केदारनाथ बिडवे, सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, मनोज पवार, जितेंद्र शिंदे, राहुल मखरे, सुरेश लांडगे, स्थानिक गुन्हे शाखेचे स्वप्निल अहिवळे, अभिजित एकशिंगे यांनी केली आहे.

# डेंग्यू-चिकुनगुनियात पुणे आघाडीवर; मात्र डेंग्यूमुळे एकही मृत्यू नाही

पुणे: डेंग्यू आणि चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर असल्याचे चित्र आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यभरात डेंग्यूचे १४,१५९ रुग्ण आढळले आहेत, तर चिकुनगुनियाच्या ३ हजार ४३९ रुग्णांची नोंद झाली आहे. यामध्ये सर्वाधिक डेंग्यू रुग्णसंख्येमध्ये धुळ्यापाठोपाठ पुण्याचा (४४ रुग्णसंख्या) समावेश आहे. तर, राज्यात सर्वाधिक चिकुनगुनियाचे रुग्ण (२२) पुण्यामध्ये नोंदविले गेले आहेत. मात्र, २०२५ मध्ये राज्यात डेंग्यूमुळे जे २१ मृत्यू झाले आहेत, त्यातील एकही रुग्ण पुण्यात असल्याची नोंद झाली नाही.

पुण्याच्या जिल्हा मलेरिया अधिकारी डॉ. अपर्णा पाटील यांनी सांगितले की, पुणे हा राज्यातील एकमेव जिल्हा आहे, जिथून रुग्णांचे नमुने थेट 'एनआयव्ही'मध्ये तपासणीसाठी पाठविले जातात. त्यामुळे तपासणी अधिक अचूक होते आणि चुकीचे निगेटिव्ह अहवाल येत नाहीत. प्रत्येक नमुन्याची डेंग्यू आणि चिकुनगुनिया



दोन्हींसाठी तपासणी केली जाते.

बहुतांश रुग्ण मजूर आणि स्थलांतरित कामगारवर्गातील असून, हे रुग्ण विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. राज्यात सर्वाधिक डेंग्यू रुग्ण असलेले जिल्हे अनुक्रमे धुळे (५८), पुणे (४४), पालघर (२०), लातूर (२०) आणि जळगाव (१८) आहेत. तर, चिकुनगुनियामध्ये पुणे (२२), पालघर (१८), धुळे (१३) आणि जळगाव (६) हे जिल्हे आघाडीवर आहेत.

पुणे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे म्हणाले, गेल्या वर्षी शहरातील डेंग्यू रुग्णसंख्या २०२४ च्या तुलनेत सुमारे एकतृतीयांशने कमी झाली आहेत. दीर्घकाळ टिकणारा पावसाळा, साचणारे पाणी आणि वेगाने वाढणारे शहरीकरण ही कीटकजन्य आजारांमागील प्रमुख कारणे आहेत.कीटकजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये सर्वसाधारणपणे ताप, अंगावर पुरळ आणि तीव सांधेदुखी, अशी लक्षणे दिसत असून, बहुतांश रुग्णांना पाणी पिणे आणि मूलभूत उपचारांनी नियंत्रण मिळते. मात्र, मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारखे आजार असलेल्या रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागते. आजार लवकर ओळखून तत्काळ उपचार घेणे महत्त्वाचे असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

# पुणे विमानतळाची जागतिक झेप; आंतरराष्ट्रीय प्रवाशांत ६४% वाढ

पुणे: पुणे विमानतळाने जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत २०२५ या वर्षात आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीत नवी विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय विमानोड्डाणांमध्ये ७४ टक्के, तर प्रवाशांच्या संख्येत तब्बल ६४ टक्क्यांची




वाढ झाली असून, पुणे विमानतळ हे पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रमुख आंतरराष्ट्रीय केंद्र (इंटरनॅशनल हब) म्हणून उदयास येत असल्याचे चित्र समोर येत आहे.

विमानतळ प्रशासनाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार,सन २०२४ मध्ये पुणे विमानतळावरून २ लाख ५ हजार ४६० प्रवाशांनी आंतरराष्ट्रीय प्रवास केला होता. त्यासाठी त्याच वर्षभरात १,४९२ विमानोड्डाणे झाली होती. मात्र, २०२५ मध्ये हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. २०२५ या वर्षात एकूण ३ लाख ३८ हजार ७७० प्रवाशांनी सातासमुद्रापार प्रवास केला असून, आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्याही वाढून या वर्षात २,६०१ वर पोहचली आहे. प्रवासीसंख्येतील ही १.३३ लाखांची वाढ पुण्याच्या वाढत्या आर्थिक आणि औद्योगिक क्षमतेचे निदर्शक मानली जात आहे. सध्या पुण्याहून दुबई (शारजाह), सिंगापूर आणि बँकॉकसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय शहरांसाठी थेट विमानसेवा उपलब्ध आहे. आयटी प्रोफेशनल, उद्योजक आणि पर्यटकांकडून या मार्गांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. मात्र, पुण्याचे वाढते महत्त्व पाहता पुणेकरांनी आता युरोप आणि अमेरिकेसाठी थेट विमानसेवा सुरू करण्याची तसेच सध्याच्या उड्डाणांच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी लावून धरली आहे.

# हॉटेल बुकिंग बदलण्याच्या नादात महिलेने गमावले ७ लाख

पुणे । प्रतिनिधी

नाशिकमधील हॉटेलची खोली आरक्षित करण्याची बतावणी करुन सायबर चोरट्यांनी एका महिलेची सात लाख २३ हजारांची फसवणूक केली असून शिवाजीनगर पोलिसांनी सायबर चोरट्यांविरुद्ध



गुन्हा दाखल केला. महिलेच्या फिर्यादीनुसार, तक्रारदार शिवाजीनगर भागात राहायला असून सायबर चोरट्यांनी महिलेच्या मोबाइलवर संपर्क साधला.

एका नामांकित ऑनलाइन बुकिंग सुविधा देणाऱ्या संस्थेतून बोलत असल्याची बतावणी करत नाशिकमध्ये आरक्षित केलेल्या हॉटेलमधील आरक्षणाची तारीख बदलतो, असे सांगितले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेच्या मोबाइलवर व्हिडीओ कॉलिंग सुविधेचा वापर करुन संपर्क साधला.चोरट्यांनी मोबाइल, तसेच अन्य बाबींची माहिती घेतली. मोबाइल क्रमांक बँक खात्याला जोडण्यात आला होता. चोरट्यांनी मोबाइल क्रमांक हॅक करुन महिलेच्या बँक खात्यातून परस्पर सात लाख २३ हजार रुपये स्वत:च्या खात्यात हस्तांतरित केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमर काळंगे तपास करत आहेत.

# निवृत्त अधिकाऱ्याची सातव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या

पुणे । प्रतिनिधी

विकसित करण्यासाठी दिलेल्या मिळकतीच्या व्यवहारात फसवणूक झाल्या प्रकरणात महावितरणमधील सेवानिवृत्त अधिकाऱ्याने नियोजित गृहप्रकल्पात सातव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बाणेर भागात घडली. ज्येष्ठाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. नरेश उमाकांत महाजन (६९, रा. अंबरनाथ पूर्व, जि. ठाणे) असे आत्महत्या केलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे.

याबाबत महाजन यांचा मुलगा मयूर नरेश महाजन यांनी बाणेर पोलिसांत फिर्याद दिली आहे. महाजन यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून बांधकाम व्यावसायिक जयंतीलाल ताराचंद ओसवाल (५६) आणि रिषभ ओसवाल (३०, दोघे रा. भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरेश महाजन हे महावितरणमध्ये अधिकारी होते. त्यांनी बाणेरमध्ये जागा घेतली होती. त्यांनी बाणेर येथील जागा स्विटी असोसिएटसचे जयंतीलाल ओसवाल यांना विकसित करण्यासाठी दिली होती. महाजन यांनी विकसित केलेल्या जागेवर मान्य केलेल्या करार, तसेच अटी आणि शर्तीनुसार ओसवाल यांनी या मिळकतीमध्ये सदनिका देतो, असे सांगितले. मात्र, कराराचे पालन न करता त्यांना सदनिका दिली नाही. या फसवणुकीमुळे महाजन हे नैराश्यात होते. महाजन यांच्या जागेवर सात मजली गृहप्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले असून, अंतर्गत कामे सुरू आहेत. महाजन हे १६ फेब्रुवारी रोजी बाणेर येथील गृहप्रकल्पाच्या आवारात आले. त्यांनी कराराप्रमाणे सदनिका देण्याबाबत ओसवाल यांच्याकडे विचारणा केली. बांधकाम व्यावसायिकांनी महाजन यांना मानसिक त्रास देऊन धमकाविले. त्यानंतर सातव्या मजल्यावरुन उडी मारून त्यांनी आत्महत्या केली, असे त्यांचा मुलगा मयूर याने फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार, बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक अनिल केकाण तपास करत आहेत.

# स्थायी समिती अध्यक्षपदी श्रीनाथ भिमाले बिनविरोध

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भाजपच्या श्रीनाथ भिमाले यांची बिनविरोध निवड झाली आहे. भिमाले यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने सुहास टिंगरे यांचा अर्ज दाखल केला होता. मात्र, टिंगरे यांचा अर्ज एक मिनिट उशिराने दाखल करण्यात आला होता.

निवडणूक सुरू झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश खडके यांनी छाननीच्या वेळी टिंगरे यांचा अर्ज विहित मुदतीनंतर आल्याने ते अवैध ठरवले. त्यामुळे भिमाले यांचा एकच अर्ज राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे



जाहीर केले. महापालिका अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे , नगरसचिव योगिता भोसले यांच्यासह स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. १६ सदस्य असलेल्या स्थायी समितीत भाजपचे १२ सदस्य आहेत. तर ३ सदस्य राष्ट्रवादीचे असून १ सदस्य काँग्रेसचा आहे.

भिमाले यांनी महापालिकेत २०१७ मध्ये सभागृहनेते पदाची जबाबदारी सांभाळली आहे. तर राष्ट्रवादीचे सदस्य अमोल बालवडकर हे या सभेसाठी अनुपस्थित होते.टिंगरे यांचा अर्ज अवैध ठरविल्यानंतर वैशाली बनकर यांनी आक्षेप घेतला. आम्ही एक वाजता पोहचलो होतो. घेण्यास एक मिनिट उशीर झाला आहे असे सांगितले. त्यावर स्थायी सदस्य विशाल धनावडे यांनी आक्षेप घेतला.यावेळी नगरसचिव योगिता भोसले यांनी कार्यालयात सीसीटीव्ही आहेत त्यात वेळ आहे. त्यामुळे अर्ज उशीरा आल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. तर प्रशांत जगताप यांनी अर्ज भरण्यास वेळेवर आल्यावर त्यांची नोंद होते. त्यामुळे नंतर आलेला अर्ज स्वीकारावा अशी मागणी केली.मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ही टिंगरे यांना माघार घेण्यासाठी वेळ दिला. मात्र, माघार न घेता राष्ट्रवादीचे दोन्ही सदस्य सभागृहातून निघून गेले. त्यानंतर भिमाले यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोबाबत मुरलीधर मोहोळ यांनी दिली गुड न्यूज

पुणे । प्रतिनिधी

शिवाजीनगर-हिंजवडी ही पीपीपी मॉडेलवरील देशातील पहिली मेट्रो लवकरच पुणेकरांच्या सेवेत येईल. या २३ किलोमीटरच्या मेट्रो मार्गिकेची चाचणी यशस्वी झाली असल्याचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. गोखलेनगर येथील शहीद तुकाराम ओंबाळे क्रीडांगणावर आयोजित १६ व्या 'जनता दरबारात' ते बोलत होते. मोहोळ यांनी नागरिकांचे प्रश्न ऐकून घेत त्यावर तातडीने तोडगा काढण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.



यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बिडकर यांसह महापालिका, पोलिस तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शहराचा सर्वांगीण विकास करून त्याला देशातील सर्वोत्तम शहर बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगत मुरलीधर मोहोळ म्हणाले, शहराचा खासदार या नात्याने मी आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार पुणेकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहोत. पुणेकरांनी दाखविलेला विश्वास महायुती सार्थ ठरवित आहे. नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण जनता दरबारच्या माध्यमातून केले जात असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. पुण्यातील वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेचा वाघोलीपर्यंत आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट मेट्रो मार्गिकेचा कात्रजपर्यंत विस्तार होणार आहे. तर खडकवासला-खराडी आणि माणिकबाग ते नळस्टॉप या नवीन मार्गिकांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होऊन शहरातील वाहतूक कोंडी दूर होईल, अशी माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली.